

# संप्रदाय अथवा घराणी

## Chapter - 3



आपल्या उत्तर हिंदुस्थानी संगीतामध्ये घराण्यांची कल्पना अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. घराण्यांच्या या विविध कल्पनेने संगीतकलेची उन्नति होवून गायक-वादकांना गौरव प्राप्त झाला आहे. तसेच घराण्यांच्या गाण्याच्या वेगवेगळ्या पद्धतींमुळे अनेक वादविवाद सुद्धा निर्माण झाले आहेत. तर काहिंमध्ये आपसांत कलह देखील निर्माण झाले आहेत.


प्राचीन भारतीय संगीतविषयक वाङ्मयात संगीताच्या प्रकारांचे व तपशीलांचे उल्लेख आहेत. पण त्यांमध्ये सातत्याने चालत आलेल्या घराण्यांचे उल्लेख आहेत काय; आणि त्यांची आजकाल जशी प्रतिष्ठा आहे, तशी त्यावेळी होती का, हेही पाहाणे आवश्यक आहे. आपण पहिल्या प्रकरणातच पाहिले की सामगानापासून आजच्या रागगानापर्यंत संगीताच्या विकासाचे जे टप्पे येत गेले, त्यांमध्ये 'घराणे' या अर्थाचा शब्दनिर्देश केलेला आढळतो. सामसंगीताच्या कालखंडात ऋषिमुनी ऋचांच्या रचना करीत व त्यांची जी परंपरा किंवा संप्रदाय निर्माण झाले त्यांचा बा.ल. आचरेकर यांनी त्याकाळच्या घराणी या अर्थाने स्पष्ट उल्लेख केला आहे. नंतर प्राचीन काळी लिहिल्या गेलेल्या भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात गीति नावाचे एक लहानसे प्रकरण दिले आहे. त्यात देखील 'गीति म्हणजे गायकीची पद्धत होय' असा उल्लेख केला आहे. ह्या गीतिंची नांवे – मागधी, अर्धमागधी, संभाविता, पृथुला.



पुढे मतंगांच्या काळात या गीतिंची नांवे बदललेली आढळतात, किंवा त्या गीतिंच्या नांवाच्या स्वरूपात बदल झालेला आढळतो. त्यांची नांवे अशी – शुद्धा, भिन्ना, गौडी, वेसरा, साधारणी. आधुनिक प्रबंधप्रकार धृपदगानाच्या वेळी या गीतिंप्रमाणेच बाण्या निर्माण झालेल्या दिसून येतात. आणि आज ख्यालगानाच्या काळात या बाण्यांप्रमाणेच घराणी निर्माण झालेली दिसून येतात.

जेव्हा कोणतीही कला विकसित होऊन समृद्ध होते आणि मर्मज्ञ व रसिक समाजात विशेष मान्यता पावते, तेव्हा तिची एक परंपरा सुरू होते. या परंपरेतच कलाकारांचा इतिहास, त्यांची कलात्मकता, त्यांच्या शिष्यशाखा इत्यादी गोष्टींच्या आधारावर निरनिराळ्या शैली व त्यांची प्रगतीही समाविष्ट असते. या दृष्टीनेच भारतीय संगीतात गायन, वादन व नृत्य या शैलींची परंपरा वेगवेगळ्या वेळी, विविध रूपांनी विकसित होत राहिली आणि कालांतराने तीच परंपरा विभिन्न घराण्यांच्या रूपाने विकसित पावली.

प्राचीन काळी या परंपरेला 'संप्रदाय' असे म्हणत. व संप्रदाय हा शब्द व्यवहारांत रूढ झालेला होता. आज देखील दक्षिण भारतीय संगीतात संप्रदाय हा शब्द घराण्यांच्या अर्थानेच उपयोगात आणला जातो.



संप्रदाय हा शब्द संस्कृत भाषेतील 'सम् आणि प्रदाय' हे दोन शब्द मिळून बनला आहे. प्रदाय शब्दापूर्वी सम् हा उपसर्ग लागल्याने[1] संप्रदाय हा शब्द बनला आहे.

सम् याचा अर्थ उत्तम प्रकारे, योग्य. आणि प्रदाय शब्दाचा अर्थ प्रदान करणे (या प्रमाणे संप्रदाय). अर्थात कोणत्याही गोष्टींचे विधीवत् व विशिष्टतापूर्वक शिक्षण देणे. पुढे हाच संप्रदाय शब्द, गुरूद्वारा शिष्याला विधीवत् दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या परंपरेचा द्योतक बनला.[2]

म्हणजेच संगीताच्या संदर्भात गुरू द्वारा शिष्याला दिल्या जाणाऱ्या क्रियात्मक व शास्त्रीय शिक्षणाच्या परंपरेला संप्रदाय म्हणण्यात आले. गायकाचे लक्षण सांगताना पं. शार्ङ्गदेवांनी आपल्या संगीत रत्नाकर या ग्रंथातील तिसऱ्या प्रकीर्णकाध्यायात 'सुसंप्रदाय' या शब्दाचा प्रयोग केला आहे. त्याचा अर्थ उत्तमगुरूपरंपरेतून शिक्षण घेतलेला असा होतो.

'सुसम्प्रदायो गीतज्ञैर्गीयते गायनाग्रणीः।'


---

१. सम् + प्र + दा + घञ्य = सम्प्रदाय, शब्दकल्पद्रुम कोश, भाग ५ वा.

२. गुरू - परम्परागत - समुपदेशः शिष्यपरम्परावतीर्णोपदेशः इति भरतः, शब्दकल्पद्रुम कोश, भाग ५ वा.

घराणी का व कशी उत्पन्न होतात-

संगीत ही एक अत्यंत सामर्थ्यशाली कला आहे. संगीताला शब्द हे आवश्यक असतात, पण नसले तरी संगीताचे सूर मानवी मनावरच नव्हे तर पशुपक्ष्यांवर सुद्धा परिणाम करतात. सूरांचे सामर्थ्य फार मोठे आहे. प्रत्यक्ष गाणे ऐकताना आपण त्या सूरांच्या वलयात इतके गुंगून जातो की आपण आपले देहभान सुद्धा विसरून जातो. आणि नंतर सुद्धा त्या स्वरलहरी आपल्या मनात घोळतच असतात. त्या स्वरलहरींनी आपण भारावून जातो. स्वरांची अशीच एखादी अद्वितीय लहर आपल्या मनावर परिणाम करते. आपला अंतरात्मा रोमांचाने बहरून जातो. व ते अद्वितीय सूर पुन्हः पुन्हा ऐकावयाची इच्छा होते. आणि गायनकलेचा हा वारसा सतत जपून ठेवण्याच्या इच्छेमधूनच घराण्याची कल्पना उदयास पावली असावी. गायकाने एखादा राग निर्माण केला, तो त्याचा वारसा कसा जपून ठेवायचा तर त्याची तंतोतंत नक्कल करून - त्याच्याच सारखे गाऊन. व ह्यासाठीच एका वेळी एक गुरू व एक शिष्य ही प्रथा निर्माण झाली असावी. अशा या गुरुपरंपरेमुळेच आजपर्यंत गायनकला चालत आली आहे.



स्वरांचे संगोपन, संवर्धन करून, त्यावर वेगवेगळे अलंकार चढवून तयार केलेली आपली कलाकृति गुरू आपल्या शिष्याच्या गळ्यांत उतरविण्याचा वर्षानुवर्षे प्रयत्न करतो. संगीताच्या भाषेत ह्यालाच तालीम (आदत) असे म्हटले जाते. याच क्रियेमुळे संगीत कला (शिष्यास) ग्रहण करता येते. स्वर लावण्याची पद्धत व गायकीचे वेगवेगळे कायदे शिष्याच्या गळ्यांत सालंकृत उतरवले जातात. या गुरू-शिष्य परंपरेत जी सातत्यता लागते त्यांतच घराण्याचा उगम होतो. म्हणजेच घराण्यांचे मुख्य तत्त्व अनुकरण आहे. गायनात ज्याप्रमाणे घराणी पाहावयास मिळतात, त्याचप्रमाणे ती वादनकलेत व नृत्यकलेत देखील आढळतात. आपण फक्त गायनातील म्हणजेच कंठसंगीतातील घराण्यांचाच विचार करणार आहोत.

घराणे या शब्दाची व्याख्या –

निरनिराळ्या विद्वानांची मते –

घर या शब्दाचा अर्थ वंश आणि घराणे या शब्दाचा अर्थ वंश-वैशिष्ट्य असे जर म्हटले, तर योग्यच होईल. कोणत्याही कलाकाराद्वारे आपल्या प्रतिभेच्या बळावर कोणत्याही नवीन पद्धतींचा, नवीन तत्त्वांचा प्रयोग करणे व त्याच पद्धतींचा अथवा तत्त्वांचा शिष्य-प्रशिष्यांकडून प्रचार व प्रसार होत राहिल्याने एक घराणे निर्मित होते.

पं. स. भ. देशपांडे यांनी आपले विचार असे मांडले आहेत –

'भारतीय संगीताचे वैशिष्ट्य असे आहे की, यात कलाकाराला आपली स्वतःची प्रतिभा दाखविण्याची संधी मिळते. रागाचे व तालाचे नियम सांभाळून प्रतिभावान कलाकार रागविस्ताराची अनोखी प्रणाली किंवा शैली निर्माण करू शकतो. जेव्हा नवनिर्मित शैली रसिकांना मनापासून आवडते, तेव्हा अनेक शिष्य त्या शैलीचा अभ्यास करण्यासाठी, ती गायकी आत्मसात करण्यासाठी, त्या प्रतिभावान कलाकाराजवळ तालीम घेण्यासाठी जातात. ही नवीन शैली ग्रहण करून, आत्मसात करून ते शिष्य ती शैली आपल्या शिष्यांना म्हणजेच पुढील पिढीला प्रदान करतात. यांप्रमाणे जेव्हा एखाद्या नवीन शैलीची परंपरा निर्माण होते, तेव्हा त्या गायनशैलीला कोणत्या तरी घराण्याचे नांव प्राप्त होते. रागविस्ताराची नवीन शैली व दीर्घ परंपरा या दोन कारणांमुळे संगीतात घराण्यांची निर्मिती होते.


स्वर, लय व बंदिश या मूलभूत संकल्पनांच्या द्वारे रागाचे एक विशाल सौंदर्य स्वरूप रसिकांच्या समोर प्रस्तुत करण्याची प्रत्येक प्रतिभावान कलाकाराची आंतरिक इच्छा असते. रागाचे आनंदमय सौंदर्य स्वरूप कलाकाराला पूर्ण रूपाने परिचित असते. परंतु ते प्राप्त करण्याचे मार्ग, प्रत्येक कलाकाराचे भिन्न असतात. आणि ह्या भिन्न मार्गालाच 'घराणे' म्हणतात.'[१]

---

१. संगीत अलंकार – पं. स. भ. देशपांडे, पृ. क्र. ५६.

श्री. चैतन्य देसाई यांनी आपले मत असे मांडले —

'संगीताची मूलतत्त्वे स्वर व लय. पुन्हा स्वर दोन प्रकारचे — आलापरूप व तानरूप. म्हणून त्याच तत्त्वांवर ख्यालगायकांचे - आलापिये, तनैयत व लयकार असे तीन प्रकार होतात. ह्याच तीन तीन तत्त्वांवर गायक - वादकांची मुख्य घराणी प्रस्थापित झाली आहेत. प्रचलित संगीताचीच दखल घेतली, तर आज अल्लादिया खां यांचे घराणे प्रमुख तनैयत घराणे गणावे लागेल. लयकारी हा आग्रा घराण्याचा विशेष आहे. आणि आलापचारीची गायकी हे किराना घराण्याचे धन आहे. त्या, त्या घराण्यात होऊन गेलेल्या महान गायकांनी त्या त्या घराण्याचे हे वैशिष्ट्य उत्पन्न केले आहे.'[1]



श्री. वा. ह. देशपांडे यांनी आपले मत असे प्रगट केले —

'संगीताच्या सौंदर्यविषयक स्वतंत्र तत्त्व प्रणाली यांनाच निरनिराळी घराणी म्हणता येईल.'[2]

ना. र. मारुलकर यांचे मत असे —

'इमारतीच्या बांधकामासाठी लागणारे दगड, माती, विटा, लाकूड, सिमेंट, लोखंड इत्यादी जे साहित्य लागते, ते सर्वांकडे एकच असते. परंतु त्यांच्या बांधकामानून मात्र निरनिराळ्या आकृतिमानाच्या विविध स्वरूपाच्या कलाकृती निर्माण होतात. आणि याचप्रमाणे घराणी निर्माण होतात. स्वर, लय, ताल, आवाज लावण्याचा ढंग याच गोष्टी संगीतात आवश्यक आहेत. आणि सर्वजण याच गोष्टींचा उपयोग करीत असतात. परंतु हे वेगवेगळ्या पद्धतीने लावल्यामुळे त्यांची निरनिराळी रूपे तयार होतात. व तीच रूपे घराण्यांच्या रूपाने पुढे येतात.'[3]

प्रा. बा. र. देवधर यांच्या मते —


'निरनिराळ्या मनोवृत्तींच्या कलाकारांच्या कलेमध्ये आपल्याला

---

१. रागशैली, प्रबंधशैली व गानशैली - चैतन्य देसाई, संगीत कलाविहार जा. १९६०.
२. हिंदुस्थानी संगीतातील घराणी - वा. देशपांडे, संगीत कलाविहार मार्च १९६९.
3. संगीतातील घराणी - ना. र. मारुलकर, पृ. क्र. ३१.

विभिन्नता दिसून येते. यालाच संगीतामध्ये ढंग किंवा शैली असे म्हणतात. अशाच कोणत्याही एका विशिष्ट ढंगावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करून जो कलाकार कलाक्षेत्रामध्ये आपले स्वतःचे एक स्थान बनवतो, पुढे त्याचे त्याच्याच नांवाने घराणे तयार होते. घराणे कधी कधी त्या व्यक्तीच्या नांवाने अथवा तो प्रतिभाशाली कलाकार ज्या स्थानी राहात असेल, त्या स्थानाच्या नांवाने प्रसिद्ध पावते. प्रसिद्ध हस्सु खां हे ग्वाल्हेर निवासी असल्यामुळे त्यांची परंपरा ग्वाल्हेर घराणे या नांवाने प्रसिद्ध झाली. अब्दुल करीम खां यांचे निवासस्थान उत्तर प्रदेशांत किराना या गावी असल्याने त्यांचे घराणे किराना घराणे म्हणून ओळखले जाऊ लागले'[1]

प्रा. अरविंद मंगरूळकर हे घराणे या शब्दाचा अर्थ सांगताना म्हणतात– 'घराणे म्हणजे अतूट परंपरा म्हणजे कधीही न तुटणारी परंपरा अथवा संप्रदाय.'[2]



पं. केशवबुवा इंगळे यांच्या मते– 'घराणे म्हणजे एका विशिष्ट पद्धतीच्या गायकीची शिष्यपरंपराच.'[3]

तुलसीराम देवांगन यांनी आपले मत असे प्रगट केले–

'व्यक्ति विशेष द्वारा चलाई हुई गायन-वादन शैली को घराना कहते हैं। विभिन्न घरानों के आदिपुरुषों ने अपनी विशेषताओं का अपनी गायन शैली में संमिश्रण कर के शिष्यों को सिखाया। उन शिष्यानुशिष्यों से परंपरा या घराना उन्नतिशील हुआ और व्यक्ति-विशेष या स्थान विशेष के नाम से चल पडा।'[4]

श्रीमती स्वतंत्र शर्मा यांनी असे लिहिले आहे–


'संगीत का साधन मानवी आवाज है, जो मानव रूप कि भाँति भिन्न हैं। यही आवाज योग्य गुरू द्वारा जब संस्कारित की जाती है,

१. आकाशवाणी पत्रिका – बा. र. देवधर, डिसेंबर १९६५.
२. हिंदुस्थानी संगीतातील घराणी – प्रा. मंगरूळकर, संगीत कलाविहार मार्च १९९२.
3. ख्यालगायकी व त्यातील प्रमुख पद्धती – पं. केशवबुवा इंगळे, संगीतकलाविहार जून १९६१.
४. भारतीय संगीत की वर्तमान आवश्यकताएँ – तुलसीराम देवांगन, संगीत डि. १९९२.

और शिष्य भी जब निरंतर अभ्यास से गुरू के मार्गनिर्देशन में गूँज, लालित्य और स्निग्धता लाकर आवाज पर भिन्न भिन्न अलंकार चढ़ाकर आवाज को स्वर का रूप देता है, तब घरानों का आविर्भाव शुरू होता है।'[१]

सुशीलकुमार चौबे यांचे मत असे—

'घरानेदार संगीत को टकसाली ऐसे विशेषण से भी सुशोभित करते हैं। जिस संगीत को हम टकसाली कहते हैं वह सच्चा और प्रामाणिक घरानेदार संगीत ही होता हैं। संगीत की टकसाल हम उस घरानेदार संगीत को कहते हैं जिसके सिक्के सच्चे होतें हैं, और जाली कभी नही होते। संगीत के बाजार में उनका सच्चा मूल्य होता हैं। ऐसे घराने शास्त्रीय संगीत के अंतर्गत आतें हैं और सभी संगीतज्ञ उनका सम्मान करते हैं। इस संगीत की शैलीयां भी गायकी और बाज के उच्चतम आदर्शों का पालन करती है और हर तरह से बेजोड़ होती है।'[२]



डॉ. शरच्चन्द्र परांजपे यांनी आपले मत असे मांडले —

'घराना या संप्रदाय गुरु तथा शिष्य के संयोग से बनता हैं। यह गुरु-शिष्य-परंपरा शास्त्र तथा कला दोनों के लिये आवश्यक मानी गई हैं। शास्त्र अथवा कला के सूक्ष्म अंगों का ग्रहण तब तक संभव नही, जब तक योग्य आचार्य से शिक्षा न ली जाय। विद्या वही सफल होती है, जो सही रूप से सीखी जाती है। विद्या या कला की सफलता में जितना योगदान योग्य शिष्य का है, उतना ही योग्य आचार्य का भी। भरताचार्य ने आचार्य के अनेक गुणों में एक गुण 'शिष्य निष्पादन' बताया है। अच्छे शिष्य ही गुरु-परंपरा को वास्तविक रूप में सुरक्षित रखने में समर्थ होते हैं और ऐसे शिष्य को तैयार करने की क्षमता अच्छे

---

१. घरानों की उपादेयता - श्रीमती स्वतंत्र शर्मा, संगीत, घराना अंक जाने/फे. १९८२.

२. संगीत के घरानों की चर्चा - डॉ. सुशीलकुमार चौबे, पृ. क्र. ११,१२.


आचार्य की अपेक्षा रहती हैं। विद्यादान करनेवाले गुरू और प्रतिभाशाली शिष्य के होने पर ही संप्रदाय या घराने का जन्म होता हैं।'[1]

सौ. वंदना चौबे यांचे मत असे आहे –

'घराना रीति या शैली का ही दूसरा नाम हैं। कला सौंदर्य का आविष्कार करती हैं, और इसी के किसी विशिष्ट अंग पर अधिकार पाने से घराने का जन्म होता हैं।'[2]

ओ. गोस्वामींच्या मते –

'१८ व्या शतकात भारतीय शासक हे इंग्रजांशी लढण्यात गर्क होते. त्यामुळे साहित्य व कला यांच्या विकासावर त्यांचे पाहिजे तेवढे लक्ष नव्हते. त्यावेळी संगीत क्षेत्रात मुसलमान गायक जास्त होते. त्यामुळे भारतीय व मुसलमान संस्कृतीच्या मिश्रणाने संगीत कलेचे एक नवीनच रूप तयार होऊ लागले. मुसलमान गायकांना संस्कृत येत नसल्यामुळे त्यांनी भारतीय संगीतात फारसी संगीताचे मिश्रण करायला सुरुवात केली. काही नवीन रागही बनविले. हिंदू दरबारी गायकांच्या संपर्कात राहिल्यामुळे भारतीय परंपरेनुसार या मुसलमान कलाकारांना राग, भाव व त्याबरोबर रागाच्या देवी शक्तीची ओळख होऊ लागली. या व्यतिरिक्त काही संस्कृत पुस्तकांचे फारसी भाषेत अनुवाद झाले होते, त्यामुळे मुसलमान गायकांना भारतीय संगीताचे नियम थोड्या फार प्रमाणात माहित झाले होते.



याप्रमाणे आपल्या स्वतःच्याच प्रयत्नांमुळे या मुसलमान गायकांमधील काही गायक कलाकार, उच्च दर्जाचे प्रतिभावान कलाकार मानले गेले. या गायकांनी हिंदुस्थानी संगीत हे शास्त्रोक्त नियमांनी गाण्याचा प्रयत्न तर केलाच, शिवाय त्याबरोबरच आपल्या कल्पनाशक्तीने त्या गाण्याला अनेक अलंकारांच्या सहाय्याने सजवून, नटवून म्हणण्याचा प्रयत्न केला. याप्रकारे रागाचे नियम पाळून व त्यातील सौंदर्य कायम

---


१. संगीत बोध – डॉ. शरच्चन्द्र परांजपे, पृ. क्र. १८०-१८१.

२. गायन के विभिन्न घराने और उनकी विशेषताएं – सौ. वंदना चौबे, संगीत घराना अंक १९८२.

ठेवून आपल्या प्रतिभेने, आपल्या व्यक्तित्वानुसार रागाला अधिकाधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न केला. परिणामी या क्रियात्मक दृष्टीकोनातून अनेक शैली उदयास आल्या.'

ओ. गोस्वामींचे कथन खालीलप्रमाणे –

'By the end of the eighteenth century political conditions in India were again in disorder and the native rulers who were patrons of music either fell a prey to foreign machinations or were busy with internecine quarrels and left music without their powerful support. Outstanding musical scholarship was wanting, but it was supplied to some extent by the scholars who were patronised by the petty chiefs. The performers, being mostly Muslims, were unable to read the Sanskrit texts but kept in touch with the Hindu scholars of the court who introduced them to the world of thought where the Raga deities lived. A few books based on Sanskrit texts had come to be translated into persian which guided the Muslim performers and thus they were not altogether ignorant of the fundamentals of Music.




By their own efforts and from practice some of these Muslim musicians became very noted performers of the art. They were not satisfied merely with giving only the correct interpretations of the Ragas following the old theory but they occasionally endowed their interpretations with an inner joy, passion, sometimes by modifying a note here and at other times by emphasising a note there or by adding new graces. These creations on

the one hand expressed the raga ideally conceived and mentally intuited, thus preserving the real significance inherent in them, and on the other hand added colour, thought and the personality of the artistes, relieving them of monotony. These came to be known as Gharanas or schools of interpretations.'[1]

भगवतशरण शर्मा यांनी देखील आपले विचार कलेच्या क्रियात्मक दृष्टीकोनातूनच मांडले आहेत —

'जे कलाकार राजे महाराजांच्या दरबारात नियुक्त झाले होते, त्यांना आर्थिक चिंता अजिबात नव्हती. व संगीत साधनेसाठी भरपूर वेळ मिळत होता. विशेष प्रसंगी त्यांना बक्षीसी रूपाने धन, आभूषणे दिली जात. या राजांना आपल्या वैभवाचे प्रदर्शन करणे आवडे. यासाठी इतर अनेक राज्यांतून प्रतिस्पर्धी बोलाविले जात व त्यांच्या स्पर्धा आयोजित केल्या जात. यामुळे संगीतकारांना आपल्या गाण्यात चमत्कृती येण्यासाठी गळ्याची तयारी करावी लागे. प्रत्येक कलाकाराने जर जबड्याची तान केली तर दुसऱ्याने आणखीन वेगळी. तानांची नांवे देखील वेगवेगळी ठेवली. उदा. — तलवार तान, कडक बिजली तान इत्यादी. ही नांवे उगाच ठेवत नव्हते, जेव्हा गायक एखादे नांव सांगून तान घेई, तेव्हा त्या तानेच्या नांवाची सार्थकता श्रोत्यांना प्रत्ययास यावी लागे. अर्थात नांवाप्रमाणेच तानेचे रूप आहे अशी श्रोत्यांकडून पावती मिळवावी लागे. या संगीतकारांनी अत्यंत कठीण परिश्रम करून, रागाची बढत करण्याचा ढंग, ताना, स्वरांच्या लगाव इत्यादी गोष्टींमध्ये आकर्षकता निर्माण केली होती. परिणामी एकाच रागाच्या प्रस्तुतीकरणात फरक पडला. त्यांच्या प्रस्तुतीकरणात भेद झाले. आणि याच भेदांना त्यांनी आपले घराणे म्हणून समोर ठेवले.'[2]



---


१. The story of Indian Music — O. Goswami, P. २६०.

२. घरानों की उपज क्यों और कैसे — भगवतशरण शर्मा, संगीत १९६१.

जी. एन. जोशी यांचे मत असे आहे —

'मोंगल साम्राज्याच्या शेवटी दरबारी संगीत हे छोट्या छोट्या संस्थानांमध्ये गेले होते. या संस्थानांमध्ये ग्वाल्हेर, उदयपूर, रामपूर, जयपूर, बडोदा, आग्रा इत्यादी प्रमुख होती. या संस्थानिकांच्या संरक्षणात हे संगीतकार संगीत साधना करीत. सतत साधना केल्यामुळे यांना इतकी प्रसिद्धी मिळाली की, त्यांच्या शैलीला विशेष मान्यता प्राप्त झाली. व त्याच शैलीला त्या संगीतकारांच्या नांवाने किंवा त्यांच्या निवासस्थानावरून ओळखले जाऊ लागले. यांनाच घराणी या नावाने संबोधु लागले.'[1]

घराणी निर्माण व्हायला राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती देखील कारणीभूत ठरली आहे. त्या दृष्टीकोनातून काही विद्वानांची मते —



प्रसिद्ध इतिहासकार अलबरूनी यांच्या मते —

'घराण्यांची परंपरा राजपूत काळापासूनच सुरू झाली. हे लोकं फार संकुचित मनोवृत्तीचे होते, आणि त्यामुळेच घराण्यांचा जन्म झाला. याकाळचे कलाकार आपल्या ज्ञानाला इतरांपासून लपवून ठेवत. ते आपल्या नातेवाईकांना देखील शिकवत नसत. आपले ज्ञान स्वतःपुरतेच ठेवत. जर त्यांना पुत्र असेल तर त्याला शिकवत, नाही तर त्यांची कला त्यांच्या मृत्यूबरोबरच समाप्त होत असे.'[2]

याप्रमाणे घरंदाज कलाकार आपआपसात वैरभावना निर्माण करून एकमेकांचा द्वेष करीत, निंदा करीत, व आपलीच शैली श्रेष्ठ समजत. यामुळे संगीत क्षेत्रही संकुचित झाले. कलाकारांच्या आपसांतील वैरामुळे कलाकारांची एकता, प्रेमभाव व संगीतासाठी अत्यंत आवश्यक असलेली हृदयाची कोमलता नष्ट झाली. एकमेकांच्या द्वेषाचा हा प्रभाव त्यांच्या अंतरंगात इतका खोलवर रूजलेला होता की मोंगल साम्राज्य


---

१. Khayal Gayaki & Its Presentation - G. N. Joshi, Journal of the Indian Musicological Society, Vol. VII No. 4, Dec. 1976.

२. भारतीय संगीत का इतिहास - उमेश जोशी, पृ. क्र. १९८.

नष्ट झाल्यावर इंग्रज राजवटीत देखील संगीताच्या विकास मनमोकळा झाला नाही.

ब्रिटिश राजवटीत इंग्रजांनी विज्ञान व इतर अनेक विषयांवर आपले लक्ष केंद्रित केले. परंतु त्यांच्या राजवटीत कलेचे क्षेत्र उपेक्षितच राहिले. संगीत कलेला राजाश्रय अजिबात मिळाला नाही. याचा परिणाम असा झाला की, संगीत कला ही गणिका व वेश्या व्यवसाय करणाऱ्या लोकांच्या हातात गेली. यामुळे साहजिकच सभ्य समाज संगीतापासून दूर गेला. संगीत विलासीनतेचे प्रतीक समजले जाऊ लागले. मोंगल साम्राज्य नष्ट झाल्यामुळे कलाकारांना उपजीविकेसाठी बाहेर जावे लागले.



जेव्हा भारतावर मोंगल साम्राज्य प्रस्थापित झाले तेव्हा काही संगीतकारांना दरबारात स्थान प्राप्त झाले, तर काही कलाकारांनी संगीतोपासना करण्याच्या दृष्टीने [illegible] राहणे पसंत केले. व संगीत साधनेलाच ईश्वर भक्तीचे साधन बनविले. अशा प्रकारे हे जे दोन वर्ग झाले त्यांना आपण संगीतजीवी व संगीतोपासक म्हणू शकतो. संगीतजीवी वर्ग केवळ [illegible] बादशहांना प्रसन्न करण्यासाठीच गात असे. यासाठी ते गळ्याची तयारी निरनिराळ्या प्रकारे दाखवित. निरनिराळ्या तानांचे प्रकार, रागाची बढत, स्वर-लगाव इत्यादी गोष्टींमध्येही ते आपली प्रतिभा व कलाकौशल्य यांमुळे सौंदर्य निर्माण करीत. परिणामी एकच राग भिन्न-भिन्न रूपाने प्रस्तुत केला गेला. कालांतराने याच भेदांना गायकांनी आपले घराणे म्हणून रसिकांसमोर ठेवले.[1]


डॉ. सुमती मुटाटकरांच्या कथनानुसार मध्यकालाच्या वेळी दरबारी संगीतज्ञ ग्वाल्हेर, रामपूर, उदयपूर, लखनौ इत्यादी संस्थानांत नियुक्त झाले. तिथे त्यांनी साधना केली. परंतु ते अशिक्षित असल्यामुळे संगीताबद्दल वैज्ञानिक व उदार दृष्टीकोण ठेवू शकले नाहीत. दुसऱ्या गायकांबद्दल ईर्ष्या बाळगून स्वतःलाच श्रेष्ठ समजू लागले. त्याचप्रमाणे आपल्या शिष्यांना देखील त्यांनी आपली कला आपल्याचपाशी जतन करून ठेवण्यास सांगितली.

---

1. भारत में संगीत शिक्षा - नंदराम चतुर्वेदी, संगीत जून १९६२.

याप्रकारे संगीतज्ञांच्या शिष्य-प्रशिष्यांच्या रूपाने घराणी स्थापित झाली.[२]

याप्रमाणे घराण्यांच्या उत्पत्तीबद्दल अनेक मते मिळतात. यावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, जेव्हा एखादा गायक आपल्या गायकीत इतरांपेक्षा काहीतरी वेगळे दाखवतो, तेव्हा त्यात, त्याच्या प्रतिभेचा स्वतंत्र विकास आणि स्वभाव दिसतो. त्याच्या गायकीत असे काहीतरी विशेष असते की, ते इतर गायकांच्या गायकीपेक्षा वेगळे दिसते. पुढे तो गायक तीच गायकी आपले पुत्र किंवा शिष्य यांना शिकवतो. व त्याचे शिष्यगण देखील त्याच प्रकारची गायकी गाऊ लागतात. अशा तऱ्हेने काही पिढ्यांपर्यंत गायकीची ती परंपरा सतत चालत असते, व तीच परंपरा पुढे घराण्यांच्या नावाने ओळखली जाते. या घराण्यांचे नामाभिकरण एक तर त्या गायकाच्या नावावरून किंवा त्याच्या निवास स्थानावरून पडते. याप्रमाणे जेव्हा एकच गायकी शिष्यपरंपरेद्वारा अनेक पिढ्यांपर्यंत चालते, तेव्हा एक घराणे निर्मित होते. अर्थात एकाच ढंगाची गायकी गाणाऱ्या अनेक गायकांना एकाच घराण्याचे मानले जाते.




## घराण्यांची उत्पत्ती आणि त्याचा विकास[१]

मनुष्याच्या आरंभीच्या जीवनाकडे दृष्टीक्षेप टाकला असता असे जाणवते की, त्या काळी संगीताचा विकास मनसोक्त झाला असावा, कारण त्याकाळी कोणतेच शास्त्र नव्हते. त्यामुळे नियमांचे बंधन असे नव्हतेच. ज्याची जशी इच्छा होई, त्याप्रकारे गाऊन तो आपले मनोरंजन करीत असे. आणि स्वतःबरोबरच दुसऱ्यांच्याही मनाला रिझविण्याचा प्रयत्न करीत असे. याच क्रमाने पुढे जसजसे वर्ग बनत गेले; संस्कृतीची वाढ होऊ लागली, तसतसे संगीत ही बदलत गेले. त्याचे अनेक प्रकार निर्माण झाले व ते अनेक भाषांत, अनेक वर्गांच्या रूपांनी विकसित होऊ लागले.

---


1. The Evolution of Indian Music - Sumati Mutatkar, Lakshya-Sangeet, June 1956.

या वर्गामध्ये ज्याप्रमाणे प्राकृतिक (नैसर्गिक) हवामान, प्रदेश व वातावरणाच्या अनुकूलतेमुळे खाण्यापिण्याच्या सवयी, वेषभूषा, राहणी इत्यादी अनेक गोष्टींमध्ये फरक दिसून येतो, त्याचप्रमाणे त्यांच्या संगीतात देखील तसाच फरक किंवा अंतर दिसून येते. प्रत्येक ठिकाणी एकसारखे वाद्य बनवणे शक्य नसे. जेथे जशी साधने उपलब्ध असतील, तशीच वाद्ये बनविण्यात येऊ लागली. वाद्यांची अनुकूलता राहणीचा ढंग आणि अनेक नैसर्गिक कारणांमुळे प्रत्येक ठिकाणचे गायनही निरनिराळ्या प्रकारचे होते. हेच संगीत आपआपल्या वर्गामध्ये विकसित होऊ लागले. आणि जन-रूचीप्रमाणे त्यात परिवर्तन होऊ लागले. आजचे लोकसंगीत याच स्वरूपाचे आहे. आणि याच कारणामुळे आज देखील प्रत्येक प्रदेशाचे, प्रांताचे लोकसंगीत निरनिराळ्या प्रकारांचे वेगवेगळे आहे. जसे मराठी, गुजराती, पंजाबी, राजस्थानी, बंगाली इत्यादी. हा निराळेपणा या लोकसंगीतात इतका दिसून येतो की, एकाच प्रांतातील एखादे छोटे गाव (खेडे) व त्याच प्रांतातील एखादे शहर यांचे संगीत परस्परभिन्न असते. आणि आज देखील काही आदिवासी ज्या ज्या ठिकाणी आहेत, ज्या भागात आहेत त्यांचे संगीत तर आणखीनच वेगळ्या प्रकारचे दिसून येते. हे झाले लोकसंगीताबाबत.



आज अभिजात संगीत म्हणजेच ख्यालगायन होय. या ख्यालगायकीमध्ये गायकाला पूर्णपणे सूट असते. अर्थात नियम असतातच पण धृपदगायनाइतके कडक नसतात. ख्यालाचा अर्थच कल्पना आहे. गायकाची स्वतःची कल्पनाशक्ती, भावप्रदर्शनाची क्षमता व गळ्यातून विविध स्वरलालित्य प्रदर्शित करण्याची क्षमता इत्यादी गोष्टींवर गायनाची सफलता, गायनाचे यश अवलंबून असते. आणि याच गोष्टींमुळे प्रत्येक गायक आप आपल्या योग्यतेप्रमाणे त्यात मधुरता, रंजकता व चमत्कृती आणण्याचा प्रयत्न करतो. म्हणजे असे की, एक शिष्य आपल्या गुरू जवळ जी गायकी शिकतो, त्या व्यतिरिक्त तो त्या गायकीत आपली स्वतःची अशी भर टाकून, त्यात नवीनपणा निर्माण करण्याचा प्रयत्न

करतो. परंतु तरीही गुरूच्या गायन शैलीची छाप त्याच्या गायनामध्ये मुख्य रूपानें असतेच. त्याचबरोबर त्याची स्वतःची स्वतंत्र प्रतिभाही दिसून येते. आणि हीच स्वतंत्र प्रतिभा विशेषत्वाने दर्शविण्यासाठी कोणी आलापाला महत्त्व दिले, कोणी तानेवर जोर दिला तर कोणी लयकारीत चमत्कृती दाखविली तर आणखी कोणी स्वरालाच महत्त्व दिले. याप्रमाणे सर्वच गायक आपआपले वर्चस्व प्रस्थापित करू पाहात होते. एकमेकांच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करीत होते. याच प्रयत्नांत प्रत्येकाने आपल्या गायकीत सौंदर्य आणण्याचा प्रयत्न केला. काहींनी त्यात फार प्रशंसनीय प्रयत्न केले व आपल्या गायकीला उच्च श्रेणीत बसविले. त्यांना श्रोते देखील तसेच मिळाले. त्यांनी तीच गायकी आपल्या शिष्यांना शिकविली. काही पिढ्या गेल्यावर त्या गायकींनी घराण्यांचे रूप घेतले.




इतर अनेक कारणांबरोबर घराणी निर्माण होण्याचे एक कारण असेही असू शकते की त्या काळी येण्याजाण्याची साधने विपुल प्रमाणात उपलब्ध नव्हती. एखादा कलाकार जेथे वास्तव्य करी तेथेच त्या राजाश्रया दरबारात तो नियुक्त होई व तेथेच आपली शिष्यपरंपरा वाढविण्यास सुरुवात करी. याप्रमाणे त्याचे शिष्य तयार होऊ लागत. स्वाभाविकच ते आपल्या गुरूच्या गायकीनेच प्रभावित होत. कारण दुसऱ्या स्थानाहून विद्यार्थ्यांना येणे किंवा त्यांच्या शिष्यांनी अन्य कोणत्याही गायकांजवळ जाऊन शिकणे. किंवा इकडे तिकडे जाऊन इतरांना शिकविणे फार कठीण होत असे.

त्याचबरोबर त्याकाळी गुरू आपल्या शिष्यांसाठी कडक नियम करी. शिष्याने इतर कोणाही समोर रियाज करणे, दुसऱ्या गायकाचे गाणे ऐकणे, दुसऱ्या गायकाकडे जाऊन शिकणे इत्यादी गोष्टी वर्जित होत्या. एका गुरूचे जेवढे शिष्य असत, तेवढे बहुतेक आपल्या गुरूजवळच राहात. याप्रमाणे एक प्रकारची मर्यादा होती. साधारणपणे सर्व श्रोते, एकाच संगीतकाराच्या गायकीने प्रभावित झालेल्या गायकांना व अर्थातच त्याच्या शिष्यांना ऐकत. तीच गायकी मूळ रूपाने पुढे येई. पुढे ती गायकी ओळखण्यासाठी तिला

त्याच गुरूचे नांव किंवा त्याच्या गावाचे नांव देण्यात येई. याप्रमाणे घराणी पुढे येऊ लागली. त्याकाळी आजच्या सारखे सर्व लोकांना अनेक गायकांचे गाणे संगीत सभांमध्ये ऐकायला मिळत नसे. आजकाल तर एकाच शहरात अनेक वेळा संगीत सभा आयोजित केल्या जातात. त्यामुळे होतकरू कलाकार अनेक गायकांचे गाणे ऐकू शकतो व त्याला जे आवडेल ते ग्रहण करू शकतो.

या सर्व गोष्टींवरून असे लक्षांत येते की, गायकांची दुर्बलता, त्यांची असहायता, कलाकारांच्या संकुचित दृष्टीकोण, राजकीय-सामाजिक परिस्थिती, त्याचप्रमाणे चढाओढीच्या स्पर्धा जिंकण्यासाठी साध्य बनणे, बादशहांना प्रसन्न करण्यासाठी गळ्यात चमत्कृती निर्माण करणे, तसेच वाहतुकीच्या साधनांचा अभाव इत्यादी अनेक कारणांमुळे घराणी विकसित झाली.




## घराण्यांची प्रथा—

प्राचीन काळापासूनच मनुष्य व्यक्तिपूजा करीत आला आहे. वैदिक काळात ऋषीमुनींबद्दल, पुढे रामायण महाभारत काळात रामकृष्णांबद्दल भक्तिभावना, राजेलोकांच्या काळांत राजांबद्दल आदर, सन्मान आणि मोंगल काळांत बादशहांची मर्जी सांभाळणे या सर्वच गोष्टी व्यक्तिपूजेचे प्रतीकच म्हणता येतील. आज सुद्धा उच्च पदावर काम करणाऱ्या व्यक्तींना प्रसन्न करण्याचे विविध मार्ग, मध्यम किंवा कनिष्ठ पदावर असलेले लोक शोधत्तच असतात.

सर्वसाधारण असा स्वभाव असलेल्या मनुष्याला जेव्हा एखाद्या कलाकाराच्या स्वतंत्र प्रतिभेचे दर्शन झाले असेल, तेव्हा त्या कलाकाराच्या कल्पनाशक्तीत त्याने विशेष काही तरी सौंदर्य पाहिले असेल; त्यामुळे त्याला सृष्टि सौंदर्याचा भास किंवा अनुभव झाला असेल; आणि ही प्रतिभा त्याला इतरांपेक्षा निश्चितच वेगळी वाटली असेल. स्वाभाविकच तो त्या प्रतिभेचा किंवा कलाकाराचा आदर करू लागला असेल. त्या

कलाकाराबद्दल त्याच्या मनांत प्रेमभावना व श्रद्धा निर्माण झाली असेल. त्याचे गाणे ऐकण्यासाठी तो नेहमीच उत्सुक राहिला असेल. त्याच्या कलाकौशल्यावर आणि बुद्धिचातुर्यावर मुग्ध होऊन शिष्यरूपाने त्याचे अनुकरण आणि रसिक रूपांत त्याच्या कलेचे रसग्रहण करीत असेल. तेव्हापासूनच केव्हा तरी घराण्यांची प्रथा पडली असावी.


संगीतात घराण्यांचा उगम केव्हा झाला? या प्रश्नाच्या उत्तरादाखल आपण असे म्हणू शकतो की, उत्तर हिंदुस्थानी संगीतात घराण्यांचा पाया जरी मोंगल संस्कृतीच्या मिश्रणानंतर पडला असला, तरी गायन-वादन-नृत्य यांमध्ये आपण ज्यांना घराण्यांच्या नांवाने आज ओळखतो त्या घराण्यांचा प्रारंभ मोंगल कारकीर्दीच्या अंतिम काळातच झाला.



## अभिजात संगीतातच घराण्यांचे महत्त्व काय?

आवाज हा एक शरीराचा नैसर्गिक धर्म आहे. जितक्या व्यक्ती तितके आवाज. प्रत्येक व्यक्तीचा आवाज म्हणजे एक स्वतंत्र रूप आहे. त्वरीत सारखा आवाज सापडणे कठीण आहे. प्रत्येक आवाजाची जात वेगळी, धर्म वेगळा त्यावर चढविण्यासारखे शोभण्यासारखे अलंकार भिन्न व त्याचा परिणाम ही भिन्न. अशा या भिन्न प्रकृतीच्या भिन्न स्वभावाच्या आवाजात गुरूने आपली कला उतरविणे अत्यंत परिश्रमाचे आहे. व ह्या क्रियेसाठी वर्षानुवर्षे श्रम करावे लागतात. गुरूच्या स्वराशी स्वर मिळवितांना कित्येक वेळा प्रगल्भ असलेला विद्यार्थी सुद्धा धायाकुतीला येतो. मग त्याची 'री' ओढणे तर दूरच! यासाठी शिष्यांच्या आवाजांत गुरूच्या वृत्तीची व गुरूच्या आवाजांतील गुणधर्माची स्थापना करण्याची क्रिया वर्षानुवर्षे करावी लागते. म्हणून इतर कुठल्याही कलेपेक्षा किंवा शास्त्रापेक्षा संगीतातच गुरू शिष्याचे संबंध जास्त निकट असतात. अभिजात संगीतात आवाज बनविण्यासाठी वर्षानुवर्षे त्यावर संस्कार करावे लागतात. रियाझ मेहनत करवून घ्यावी लागते. संस्कारित आवाज

हाच अभिजात संगीतात ग्राह्य असून असंस्कारित आवाजाला घरंदाज गायकीत स्थान नाही, कारण संस्कार करूनच आवाज सुरेल बनवावयाचा असतो. आणि नित्य मेहनतीनेच तो सुरेल व स्थिर बनतो. त्यामुळेच आवाज हुकमी लावता येतो. आवाजांतील वजनामुळेच गायन प्रभावी व परिणामकारक होते, एरवी नाही. एकूण आवाज सुरात लावता येणे, तो ह्या त्या स्वरावर स्थिर ठेवता येणे, त्यातील वरचे खालचे कण स्वेच्छेने व हुकमी लावता येणे, आवाजांत वजन आणणे ह्या गोष्टी आवाजावर घेतलेल्या मेहनतीनेच शक्य होतात व ही सर्व क्रिया गुरूच्या मार्गदर्शनानेच शक्य होत असते. ह्याच गोष्टींमुळे अभिजात संगीतात घराण्यांचे महत्त्व प्राबल्याने दिसून येते. म्हणूनच अभिजात संगीतात गंडाबंधन, शागिर्दी अशा गोष्टींना महत्त्व आहे.



हिंदुस्थानी संगीत हे मौखिक परंपरेवर आधारित आहे. अर्थात गुरू-शिष्य परंपरेमुळेच हे संगीत आज जिवंत आहे. आतापर्यंत गुरू-शिष्य परंपरा ह्या शब्दाचा प्रयोग अनेकदा झाला आहे. या गुरू-शिष्य परंपरेमुळेच घराणी निर्माण झाली आहेत. त्या अनुषंगाने ही गुरू शिष्य परंपरा किंवा गुरू शिष्य प्रणाली म्हणजे काय, याचे विवेचन करणे इष्ट होईल.

## गुरू-शिष्य परंपरा —

आपण सुरुवातीलाच पाहिले की, घराण्यांचे मुख्य तत्त्व अनुकरण आहे. अनुकरण म्हणजेच नक्कल. ही नक्कल शिष्य, गुरूची करतो. आज विकसित झालेल्या घराण्यांचा पाया मुख्यतः ही गुरू-शिष्य परंपराच आहे. या परंपरेचे प्राचीन स्वरूप पाहू.

त्याकाळची शिक्षण पद्धती तात्कालीन सामाजिक परिस्थिती प्रमाणे होती. म्हणजे चालू वर्तमान काळापेक्षा अगदीच भिन्न होती. त्या काळचे विद्यार्थी गुरूगृही राहून प्राचीन प्रथेनुसार विद्योपार्जन करीत. या परंपरेला 'गुरूकुल पद्धती' म्हणत. गुरूकुल याचा अर्थ गुरूच्या घरी राहून

विद्या प्राप्त करणे. उदा. — राम, कृष्ण, तानसेन इत्यादींनी गुरुकुलातच शिक्षण घेतले. ज्या विद्यार्थ्यांना संगीत शिकण्याची तीव्र ईच्छा असे, ते विद्यार्थी अनेक वर्षे गुरूच्या घरी राहून संगीत शिकत. अर्थातच गुरुगृही राहून गुरूच्या सेवेत पूर्णपणे लीन होणे आवश्यक होते. या परंपरेत 'गुरु, विनय आणि साधना' या तीन शब्दांचे अत्यंत अत्यंत महत्त्व आहे.


गुरू, जो आपल्या शिष्याला कोणत्याही (एका) विषयाचा पूर्ण रूपाने परिचय करून देतो आणि उपदेश व ज्ञान देतो, तो गुरू ही पदवी ग्रहण करण्यास योग्य आहे.

पं. रविशंकर म्हणतात —

We give a very important place to the guru, for we consider him to be the representation of the divine. There is a saying —

'पानी पिया जानके, गुरु बनाया जानके'

which means that one should drink water only after it has been filtered, and one should take a guru only after one feels sure of the decision.[1]



विनय याचा अर्थ नम्रता. 'विद्या विनयेन शोभते' असे म्हणतात. आणि ते खरेच आहे. माणसाच्या अंगी नम्रता असावी.

या शिक्षण पद्धतीतील तिसरा गुण साधना होय. आणि याचा अर्थ अभ्यास, कठीण परिश्रम व अनुशासन असा अभिप्रेत आहे.


याशिवाय ज्या ठिकाणी साधना करावयाची, त्या स्थानाला देखील फार महत्त्व असे. ते स्थान जनकोलाहलापासून दूर, एकांत जागी, रम्य अशा निसर्गाच्या कुशीत असे, कारण अशा ठिकाणी मनाची एकाग्रता फार लवकर साधली जाते. त्या काळी संगीत शिक्षणाची व्यवस्था व्यक्तिगत होती, संस्थागत नव्हती.

---

1. My Music My Life - Pt. Ravishankar, P. 11.

या प्रणालीत गुरू हेच चालते-बोलते शिक्षणशास्त्र मानले जात असे. गुरू हा शिष्यांचा शिक्षक, मार्गदर्शक, शासक एवढेच नव्हे तर पालकही होता. समाजामध्ये संकलित झालेले ज्ञान लेखनाद्वारे ग्रंथ रूपाने प्रसृत करण्याचे तंत्र जोपर्यंत उपलब्ध झाले नव्हते, तोपर्यंत गुरुमुख हेच ज्ञान-संक्रमणाचे एकमेव साधन असे. ज्ञानामध्ये काटेकोर अचूकपणा यावा व पूर्ण ज्ञान-भांडार अ-विकृत स्थितीत गुरूंपासून शिष्यांस प्राप्त व्हावे ही उद्दिष्टे साध्य करण्याची जवाबदारी गुरूंवर असल्यामुळे गुरूंचे वैयक्तिक जीवन हे ही त्यांच्या विशाल सामाजिक जीवनाचे एक प्रमुख अंग बनले होते. गुरूला ज्ञान, स्वाध्याय, तप, त्याग व स्नेह यांचे सचेतन आदर्श म्हणून समाजात प्रतिष्ठा होती.

विषयाची ओढ, आवड, कष्ट करण्याची तयारी, गुरू-निष्ठा इत्यादी गुणांची कडक परीक्षा घेऊन पारखूनच शिष्य स्विकारला जात असे. गुरूच्या आज्ञेचे पालन आणि गुरूची सेवा या नंतरच जर गुरू कृपा झाली तरच शिष्यांना विद्या प्राप्त होणे संभव होते. परीक्षेत पूर्णपणे उतरलेल्या शिष्यांना गुरू आपली विद्या मनमोकळेपणाने देत असे.




ही गुरुसेवा अनेक तऱ्हेने होत असे. गुरूचे हातपाय दाबणे, गुरुगृही कामे करणे, गुरूची चिलीम भरून देणे, गुरूची सर्व व्यसने पुरवणे इत्यादी सर्व प्रकारची कामे शिष्यांना करावी लागत. याबाबत स्व. पं. भास्करबुवा बखले यांचे उदाहरण उल्लेखनीय आहे. गुरू कुलातील ही आठवण बडोद्याचे वकील दाजीसाहेब तांबे यांनी दिली आहे, ती अशी-

'भास्करराव व मी म्हणजे गुरुबंधु. कारण फैजमहंमद खां यांच्याकडे गाणे शिकण्यास मी बुवांच्याच बरोबर होतो. गुरुजी वयस्क होऊ लागले होते. बसल्या जागेवरून उठून जाऊन काही व्यवहार करण्याचा त्यांना कंटाळा येऊ लागला. त्यांचे अंग रगडणे, डोक्याला तेल लावणे वगैरे कामे शिष्यांना करावी लागत.

एकदा खांसाहेबांची प्रकृति बरी नव्हती, भयंकर खोकला झाला होता. रोजची तालीम देण्याचा आळस त्यांनी केला नाही. मध्येच

खोकल्याचा उमाळा आला. त्यांनी उगा-दान (तस्त) आणण्यास बुवांना सांगितले. ते काही केल्या सापडेना, खोकल्याचा जोर वाढला व कफ जमिनीवर पडणार तोच खांसाहेबांनी बुवांना बोलावून 'भास्कर, यह लेव' म्हणून बुवांच्या ओंजळीत सर्व इस्तेर टाकली. बुवांनी तिचा ताबा घेऊन, बाहेर जाऊन आपली सोडवणूक करून घेतली व परत पलटे घोकण्यास बुवा जागेवर येऊन बसले. गुरुसेवेचा हा प्रकार मला किळसवाणा वाटला. मी गाणे सोडले.

आपला एके काळचा गुरु-बंधु किळसवाणी गुरु-सेवा करून गायनाचार्य झाला. बुवांची पूर्वीची स्थिती व नंतरची वैभवशाली स्थिती डोळ्यांसमोर उभी राहिली, म्हणजे बुवांनी भक्तीने परमेश्वर-स्वरूप मिळवले, ते स्वरूप निराळे नाही असेच भास होतो.'[1] या एकाच उदाहरणावरून आपल्यास गुरुसेवेची कल्पना येऊ शकते.



गुरूने शिष्याची निवड केल्यावर गंडाबंधनाचा सोहळा होई. गुरू शिष्याच्या हातावर आपल्या हाताने एक दोरा-धागा पवित्र मंत्रोच्चारणात बांधून गंडा बंधन करी. शिष्य गुरूचे पदवंदन करी. तेव्हापासून त्याचे विधिवत शिक्षण सुरू होई. आपआपल्या कुवतीप्रमाणे शिष्य गुरूला गुरुदक्षिणा देत. यालाच उस्तादी भाषेत गंडाबंधन म्हणतात. या गंडाबंधनामुळे गुरू व शिष्य यांचे संबंध पिता-पुत्राप्रमाणे होत. त्यांच्यात एक प्रकारचा आपलेपणा येई. गुरू शिष्याला आपल्याच परिवाराचा सदस्य मानी. शिष्य देखील गुरूला आपल्या पित्याप्रमाणे मानून, त्याच्या सेवेत कोणतीही कमतरता न ठेवता विद्या प्राप्त करी.


शिष्य गुरुगृही राहून सर्व तऱ्हेने गुरूसेवेत जागरूक राहात असे. आपल्या उपजीविकेसाठी त्यांना भिक्षेवर (ज्याला मधुकरी म्हणतात), अवलंबून राहावे लागे. इतकेच नव्हे तर, गुरूने जर ईश्वरभक्तीत लीन होऊन सर्वसंगपरित्याग केला असेल तर त्याच्या उदरपोषणाचा भार देखील शिष्यावरच पडत असे. अर्थात याप्रमाणे गुरूचा निर्वाह देखील शिष्याच्या मधुकरीवरच चाले.

---

१. भास्करबुवा बखले - नीळकंठ केळकर, पृ. क्र. १०८.

## स्वर-साधना -

गान कला शिकणे व तिची साधना किंवा रियाज करणे याचे काही विशिष्ट नियम आहेत. या नियमांचे श्रद्धेने पालन करूनच विद्यार्थी आपल्या परंपरेचा खराखुरा प्रतिनिधी होऊ शकतो. गुरू-शिष्य परंपरेत या नियमांचे पालन फार कठोरपणे केले जाई. सुरुवातीला विद्यार्थ्याला पूर्ण स्वरज्ञान नसते. आपल्या आवाजावरही त्याचे नियंत्रण नसते. अशा स्थितीत गुरू सतत त्याला मार्गदर्शन करीत असतो. त्याच्या चूका दाखवतो. त्याचप्रमाणे काही अलंकारिक पलटे किंवा तानांचा आपल्यासमोर अभ्यास करवून घेतो. यामुळे विद्यार्थ्याला साधनेचा मार्ग समजतो व परिश्रम करून, मेहनत करून तो आपल्या आवाजावर अधिकार प्राप्त करू शकतो.



श्री. रातांजनकर प्राचीन संगीत शिक्षणाबद्दल अशी माहिती देतात -

'संगीत शिक्षणाचा प्रारंभ 'स्वर भरणे' या क्रियेने होत असे. शिष्याच्या गळ्याला योग्य असा मंद्र सप्तकातला सा त्याने दम टिकेल तितका वेळ लावावा असे रोज सकाळी लवकर उठून करायला लावीत. यामुळे आवाजाला स्थैर्य, ताकद, सुरेलपणा व श्वासावर काबू येणे या सर्व गोष्टी होत असत. त्यासाठी योग्य मार्गदर्शन न मिळाल्यास आवाज फाटण्याचा संभवही असतो व कदाचित चुकीच्या पद्धतीने आवाज काढण्याची सवय लागते. उंच पट्टीच्या आवाजाच्या विद्यार्थ्याला फार खालच्या सप्तकात गाऊ देत नसत. तसेच खालच्या पट्टीच्या विद्यार्थ्याला उंच पट्टीत ओरडूही देत नसत. गुरूचे समाधान झाल्याखेरीज पुढे तालीम मिळत नसे. हे स्वर भरणे कित्येक दिवस, महिने कधी कधी काही वर्षेही करायला लावीत असत. पूर्वीचे शिष्यही न कंटाळता चिकाटीने ही साधना करीत असत.'[१]


---

१. आधुनिक संगीत-शिक्षण-वर्ग यांचा तुलनात्मक अभ्यास - स्व. श्री. ना. रातांजनकर, अनुवादक - श्रुती सडोलीकर, संगीत कलाविहार, ऑगस्ट १९८०.

खां. विलायत हुसैन खां यांनी आपले अनुभव असे दिले आहेत—

'मैंने बचपन में अपने घर में एक हजार दानों की बडी माला देखी हैं और एकतारा भी। संगीत का रियाज करते वक्त एक साँस भरने पर माला का एक दाना घुमाया जाता था। इस क्रिया में कितना समय लगता होगा और कितना प्राणायाम होता होगा, इसका सहज ही अन्दाज किया जा सकता हैं।'[1]

याप्रमाणे प्राचीन काळी शिष्याचा आवाज संगीतोपयोगी बनविण्यासाठी गुरू त्याच्या आवाजाच्या गुणधर्मानुसार अभ्यास करवून घेत असत. आणि मगच कुठलाही एक राग शिकविण्यास प्रारंभ करीत. त्या रागाचे आरोह-अवरोह घोटून घेत. सुरुवातीला अशा रागांची तालीम आठ-आठ महिने चाले. याच वेळी विद्यार्थ्याला गायकीच्या सर्व अंगांच्या व प्रकारांचा परिचय करून देणे आवश्यक असते. विद्यार्थ्याला आलाप, बोलआलाप, बोलतान, तान इत्यादी अंगांचा विविध प्रकारांनी परिचय करून दिला जातो. याचवेळी ताल ज्ञानही दिले जाते. पहिल्या रागाला आठ महिने, एक वर्ष लागले तरी चालते, कारण मग पुढे विद्यार्थ्याला दुसरा राग शिकणे सोपे होते व वेळही कमी लागतो.



सुरुवातीला सामान्यतः यमन, बिलावल, भैरवी इत्यादी मूळ थाटांच्या चलनाचा अभ्यास खुल्या आवाजात करवून घेत. याच बरोबर यमन, भैरव, खमाज यांसारख्या रागांमध्ये धृपद शैलीची काही गीते व त्याच रागांतील स्वरसंगतींचा अभ्यास करावा लागे. या संगीत शिक्षणाचा निश्चित असा पाठ्यक्रम नव्हता. गुरू जे शिकवी तेच शिष्याला शिकणे भाग असे.


गुरुजन असे म्हणत की, 'एक साधे सब सधे, सब साधे सब जाय।' अर्थात एक राग पूर्ण तऱ्हेने साधला तर दुसरा राग अगदी सहजपणे समजेल. गायन, वादन व नृत्य या तीन्ही कलांसाठी हा सिद्धांत लागू होतो.

---

१. संगीतज्ञों के संस्मरण - खां. विलायत हुसैन खां, पृ. क्र. ४.

अनुशासन म्हणजे शिस्त, हा घराण्यांच्या तालमीचा महत्वपूर्ण भाग असे. गुरूची प्रत्येक गोष्ट आज्ञा असे. व तिचे पालन करणे शिष्याचे कर्तव्य होते.

जर गुरूने सांगितले की, हा पल्टा एक हजार वेळा घोरा, तर मग तो पल्टा ९९९ वेळा घोरण्याची शिष्याची हिंमत नसे. याशिवाय शिष्याला दुसऱ्या घराण्याची गायकी ऐकणे पूर्णतः वर्ज्य होते. कारण प्रत्येक घराणे स्वतःलाच श्रेष्ठ समजे. दुसऱ्या कोणत्याही घराण्याची सावली देखील त्यांना नको वाटे. असे म्हणतात, 'स्व. अल्लादिया खां हे आपले पुत्र मंजी खां यांच्यावर नाराज होते कारण मंजी खांच्या गायकीवर ग्वाल्हेर घराण्याचे रहिमत खां यांचा फार प्रभाव होता.' हीच सर्व बंधने घराणा पद्धतीची रक्षक बनली. शिष्यांना स्वतःच्या घराण्याच्या गायकीशिवाय दुसऱ्या घराण्याचे गाणे ऐकण्याची अनुमती नव्हती. यांमागे विद्यार्थ्यांचे हित हाच दृष्टीकोन होता. कारण या अपरिपक्व काळांत कलाक्षेत्रातील शुद्ध-अशुद्ध, चांगले-वाईट समजण्याची पात्रता शिष्यात नसते. अशा वेळी अनुकरण करण्याची प्रवृत्ती असलेला विद्यार्थी पथभ्रष्ट होण्याची किंवा त्याच्या गायनात दोष उत्पन्न होण्याचा संभव असतो. परंतु सांगीतिक तत्त्वे चांगली समजून घेतल्यावर व ती ग्रहण करण्याची योग्यता उत्पन्न झाल्यावर विद्यार्थी जर दुसऱ्या कलाकाराचे चांगले गुण घेऊ इच्छील, त्या कलाकाराचे अनुकरण करू इच्छील, तर याबाबतीत गुरूकडूनही त्याला प्रोत्साहनच मिळे.




थोडक्यांत प्राचीन काळी संगीताचे अध्ययन गुरूवरच अवलंबून असे. गुरू म्हणेल ती पूर्वदिशा. विशिष्ट असा अभ्यासक्रम नव्हताच. बंदिश लिहिण्यासाठी स्वरलिपी किंवा अन्य कोणतेही साधन नव्हते. शिष्य, गुरूची हुबेहुब नक्कल करायचा प्रयत्न करी, त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करी. प्राचीन काळी संगीताच्या क्रियात्मक पक्षावर अधिक जोर दिला जात असे. या गुरू-शिष्य परंपरेतूनच उच्च दर्जाचे कलाकार निर्माण होत होते.

आधुनिक काळात ही गुरू-शिष्य परंपरा जवळजवळ नष्टच होत चालली आहे. कारण आधुनिक काळात महाविद्यालयीन शिक्षण पद्धतीचा प्रसार झाल्यामुळे संगीत शिक्षण सामूहिक रित्या दिले जाते. यावरून असे दिसून येते की, शास्त्रीय संगीताची उन्नती होण्यासाठी ज्या वातावरणाची आवश्यकता आहे, ते वातावरण आज विश्वविद्यालयात मिळू शकत नाही. गुरू व शिष्य यांचे व्यक्तिगत नाते, यावरच शास्त्रीय संगीताची तालीम अवलंबून होती. परंतु आजच्या सामूहिक शिक्षण पद्धतीमुळे ही गोष्ट पूर्ण होऊ शकत नाही.

आजकाल एकाच वेळी अनेक विद्यार्थ्यांना गुरूकडून तालीम घ्यावी लागते. महाविद्यालयीन शिक्षण पद्धतीत गुरू देखील एकाच घराण्याचे नसून निरनिराळ्या घराण्यांचे असतात. त्यातही काहींना स्वतःच्या घराण्याचे, परंपरेचे ज्ञानच नसते अर्थात त्यातही काही अपवाद असतातच.

या संस्थागत शिक्षणाचा मुख्य दोष शिक्षणाचे सामूहिक रूप होय. एका वर्गात १५ विद्यार्थी आणि एक शिक्षक. यामुळे घरंदाज तालमीत जे नाते गुरू-शिष्यांमध्ये आपोआप निर्माण होई, ते संस्थागत शिक्षणात निर्माण होऊ शकत नाही. तसेच थोड्या वेळात विद्यार्थ्यांवर नीट लक्ष देता येत नाही. महाविद्यालयीन संगीत शिक्षणात विशिष्ट असा अभ्यासक्रम असतो. आणि तो पाठ्यक्रम विशिष्ट अवधीतच पूर्ण करावयाचा असतो. त्यामुळे विद्यार्थी अनेक राग शिकतात, पण एकही राग त्यांच्या डोक्यांत बरोबर उतरलेला नसतो. यांतून कलावंत निर्मिती कशी होणार? अर्थातच तानसेन तर निर्माण होतच नाही पण उत्तम कानसेन निर्माण होणे देखील संभवत नाही.




त्याचप्रमाणे या संस्थागत शिक्षणात कंठ साधना (voice culture), याकडे अजिबात लक्ष दिले जात नाही. आवाजाच्या गुणधर्मानुसार शिष्यांचे वर्गीकरण करून त्यांचा आवाज तयार करण्याची सोय आज उपलब्ध नाही. पुरूष विद्यार्थी व स्त्री विद्यार्थी यांना एकाच वेळी, एकाच वर्गात, एकाच सुरावर व एकाच शिक्षकाकडून

शिक्षण घ्यावे लागते. पुरूषी आवाज व स्त्रीसुलभ आवाज यांत फरक असणारच, पण अशा सामूहिक शिक्षणांत आवाजाच्या या महत्त्वपूर्ण बाबीकडे दुर्लक्ष केले जाते.

प्रत्येक विद्यार्थ्याला एकच गोष्ट अभ्यासावी लागते. ती त्याला आवडो अथवा न आवडो. दिलेला अभ्यासक्रम पूर्ण करून परीक्षेत पास होण्यासाठी तो फक्त राग, ताल, आलाप घोकतो. परंतु अशा शिक्षणामुळे कलावंत-निर्मितीच्या दृष्टीने 'काहीच फायदा होत नाही.

घराण्याच्या प्रस्थापनाची क्रिया–



घराणे म्हटले की त्याला काही पिढीजात परंपरा हवी. घराणे हा शब्द उच्चारल्याबरोबर प्रथम काही कल्पना मनांत येत असेल तर अशी की, त्याला काही घरंदाजपणा, खानदान आहे किंवा नाही. घराणेपद प्राप्त होण्यासाठी कमीत कमी तीन पिढ्यांचे सातत्य असावे लागते. ग्वाल्हेर, जयपूर, आग्रा, किराना इ. घराण्याच्या गायकांवर नजर टाकली तर असे दिसून येईल की, या घराण्यात किमान पक्षी तीन पिढ्यांचा समावेश झाला आहे. घराण्याचे संस्थापक, त्यांचे शिष्य व त्या शिष्यांचे शिष्य. उदा.– ग्वाल्हेर घराण्यात संस्थापक – हद्दु हस्सु खां, त्यांचे शिष्य – बाबा दीक्षित, वासुदेवबुवा जोशी व यांचे शिष्य पं. बालकृष्णबुवा इचलकरंजीकर इ. जयपूर घराण्यात संस्थापक – खां. अल्लादियाखां, त्यांचे शिष्य मोगूबाई कुर्डीकर, केसरबाई केरकर व यांचे शिष्य किशोरी अमोणकर, धोंडूताई कुलकर्णी इत्यादी.

ज्या घराण्यात अशी शिष्यशाखा झाली नाही, ती घराणी ह्या नावाने पुढे आलीच नाहीत. उदा.– कै. भास्करबुवा बखले, कै. रामकृष्णबुवा वझे ह्यांच्या स्वतंत्र गायकीची घराणी आढळत नाहीत. यावरून असेच सिद्ध होते की घराणेपद प्राप्त होण्यास कमीत कमी तीन पिढ्यांचे सातत्य असावे लागते.

वा. ह. देशपांडे यांनी घराणेपद प्राप्त होण्यासाठी तीन वैशिष्ट्ये सांगितली आहेत. ती अशी —

१. घराण्याला घराणेपद प्राप्त होण्यासाठी काही पिढ्यांचे तरी सातत्य लाभावे लागते आणि त्याचा प्रसार व्हावा लागतो.

२. घराण्याची म्हणून काही रीत किंवा शिस्त असते. संगीताच्या भाषेत बोलायचे म्हणजे घराण्यांचे काही कायदे असतात.

३. प्रत्येक घराणे एखाद्या प्रभावशाली गुरूच्या आवाज-धर्मावर आधारलेले असते.[1]


एखाद्या पारिवारिक घराण्यांतील व्यक्तींमध्ये कुलीनपणा, घरंदाजपणा आहे असे आपण म्हणतो, तेव्हा याचा अर्थ हाच की, त्यांच्या वागण्याला रीत आहे, शिस्त आहे, चालीरीतींच्या परंपरा आहेत, त्यांनी आचारविचारांच्या मर्यादा पाळल्या आहेत, त्यांत कुठल्याही तऱ्हेने शिस्तीचा अभाव नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक सांगीतिक घराण्यांच्या गायकीत काही रीतभात, शिस्त आहे, काही विशिष्ट कायदे आहेत, व त्यांचे पालन त्या त्या घराण्यांच्या गायकांनी केलेले दिसते.

त्याचप्रमाणे एखादा प्रसिद्ध गायक जेव्हा निर्माण होतो, तेव्हा त्याच्या गायकीची रीत, तिची सौंदर्यात्मकता, तिचे अंतर्गत कायदे हे त्या गायकाच्या स्वतःच्या आवाजधर्मावर आधारित असतात. स्वतःच्या आवाजाच्या गुणधर्माची संपूर्ण पारख व योग्य जाणीव झाली, म्हणजे आपल्या आवाजाला खुलून दिसण्यासारखे गायकीचे प्रकार गायक आपल्या गायनांत अधिक करतो. त्याची आवाज लावण्याची पद्धत व गायकीचे सर्वसामान्य स्वरूप यांवरून त्या गायकाच्या घराण्याची विशिष्ट गायकी तयार होत असते. म्हणजेच प्रत्येक घराणे हे संस्थापकाच्या आवाजधर्मावर आधारलेले आहे, असे दिसते.

---


१. घरंदाज गायकी- वा. ह. देशपांडे, पृ. क्र. २०.

प्रत्येक घराणे जरी त्या घराण्याच्या संस्थापकाच्या आवाज-धर्मावर अवलंबून असले तरी त्याच्या सर्वच्या सर्वच गोष्टी शिष्यां-मध्ये म्हणजे त्यांच्या गळ्यांत येऊ शकत नाहीत. म्हणजे कसे, यावर विचार करू-



प्रत्येक तरूण गायकाला आपल्या आवाजाच्या विशिष्ट पातळीवर (आपल्या आवाजाच्या गुणधर्मात मोडणारे), जे घराणे प्रभावशाली वाटेल, त्याच घराण्याच्या गायकीचे आकर्षण वाटत असते. हा त्याचा स्वाभाविक कल त्याच्या स्वतःच्या आवाजधर्मावरच अवलंबून असतो. गायकीची रीत, तिचे अंतर्गत कायदे व तिची सौंदर्यात्मकता या गोष्टी आवाजधर्मावर अवलंबून असतात. आपल्या आवाजातील गुणधर्मांची पारख व योग्य जाणीव झाली म्हणजे ह्या तरूण गायकाचा कल आपल्या आवाजांस खुलून दिसण्यासारखी गायकी आत्मसात करण्याकडे वळतो. एका विशिष्ट घराण्याची गायकी त्याला इतर घराण्यांच्या गायकीच्या तुलनेने अधिक आवडते, कारण त्या घराण्यातील गायकीच्या रीती व जाती त्याच्या स्वतःच्या आवाजाला सहज-गत्या आत्मसात होण्यासारख्या असतात. आणि याच गोष्टींमुळे हा तरूण गायक त्या विशिष्ट घराण्याची तालीम घेतो, व त्या घराण्याची परंपरा पुढे चालवतो. पण असे जरी असले तरी गायकाचा स्वतःच्या आवाजाचा म्हणून खास धर्म असतोच. त्यामुळे त्यांत गुरूच्या गायकीतल्या सगळ्या गोष्टींचे, प्रकारांचे अनुकरण होऊ शकत नाही. त्यांतील जितके प्रकार आत्मसात करता येतील तितके तो घेतो व बाकीचे सोडून देतो. याचाच अर्थ असा की प्रत्येक शिष्य हा आपल्याला झेपतील, पेलतील व शोभतील अशाच गोष्टींचे अनुकरण करतो. पण त्याची दृष्टी मात्र शोधक असते. आजकाल शास्त्रीय संगीताचे बरेच कार्यक्रम होत असतात. अशा कार्यक्रमांमधून निरनिराळ्या घराण्यांतील कलाकारांचे गाणे ऐकण्याची सुवर्णसंधी सर्वांनाच मिळते. यातूनही तो तरूण गायक आपल्या आवाजाला शोभतील व पेलतील


अशा गोष्टींचा शोध घेतच असतो. स्वतःच्या आवाजावर चढणारे गुण तो इतस्ततः विखुरलेले पाहात व ऐकत असतोच. त्यांपासून त्याला स्फूर्तीही मिळते. ही स्फूर्ती कोणापासून मिळेल हे काही सांगता येत नाही. इतर अनेक घराण्यांच्या कलाकारांपासून आपल्या आवाजात खुलून दिसणाऱ्या बऱ्या-वाईट गोष्टींची त्याची निवड चाललेली असते. म्हणजे परंपरेने चालत आलेल्या गायकीत तो इतस्ततः ऐकलेल्या गायकांपासून आवडतील ते प्रकार आत्मसात करतो व आपल्या घराण्याच्या गायकीत भरच टाकतो. याचाच अर्थ असा की, प्रत्येक कलाकार हा आपल्या गुरूची अगदी प्रतिकृती नसतो. परंपरेने चालत आलेल्या गायकीत इतरत्र ऐकलेले गुण मिसळून आपला स्वतंत्र रांधा तयार करीत असतो, व ज्या मानाने त्याचे व्यक्तिमत्व प्रभावशाली असते त्याप्रमाणेच तो नावारूपाला येतो. आणि अशा रीतीने परंपरा टिकविण्याच्या कार्यास मदतच करीत असतो. या संदर्भात वा. ह. देशपांडे यांनी केलेले विवेचन बुद्धीला पटते, ते म्हणतात- 'जुनी रीतभात, परंपरा, कायदे यांच्या बंधनांतूनही प्रत्येक गायकाकडून नवीन नवीन गोष्टी घराण्यात सतत सामील होत असतात, व तशा होत असतानाही त्यात घराण्याची म्हणून जी सौंदर्यप्रणाली असते, तिच्या खुणा अगर निशाणी शिल्लक राहतेच. उदा.- खां. अब्दुल करीम खां, सवाई गंधर्व व श्री भीमसेन जोशी या तिघांचेही गायन ऐकण्याचा योग ज्यांना आला असेल, त्यांना प्रत्येक गायकागणिक घराण्यांत नवीन नवीन गोष्टी कशा सामील होतात व तरीही घराण्याची निशाणी अथवा खूण कशी शिल्लक राहते, याची सत्यता पटेल. खां. अब्दुल करीम खां, श्रीमती हिराबाई बडोदेकर व त्यांच्या अनेक शिष्या यांच्यातही हा दर गायिकेगणिक झालेला फरक जाणवल्याखेरीज राहात नाही.



तेव्हा घराणे म्हणजे खूण अगर निशाणी म्हणून गायकीची विशिष्ट रीत टिकविणारी पण त्यांत दर गायकागणिक नवीन नवीन

गोष्टींचा समावेश करून घेणारी व अशा रीतीने सातत्य टिकविणारी एक परंपरा असे म्हणावे लागेल. म्हणजेच परंपरा व पृथगात्मता यांच्या संमिश्रणापासूनच घराणी मूळ धरतात व फोफावत जातात, असे म्हणता येईल.'[१] ज्या घराण्यांमध्ये अशी परंपरा किंवा प्रक्रिया होत नाही ती घराणी गतिबद्ध होतात. उदा०- गोखले घराणे. या घराण्याचे प्रवर्तक-पं. महादेवबुवा गोखले, त्यांचे शिष्य त्यांचे पुत्र व पुढे हे घराणे इथेच खुंटले. गोखले घराण्याची परंपरा दुसऱ्या पिढी-पर्यंतच समाप्त झाली असे दिसते. हे घराणे शिष्य रूपाने पुढे वृद्धींगत झालेले दिसत नाही.

घराण्यांची वैशिष्ट्ये-




शास्त्रीय संगीतातील घराण्यांचा आधार ख्याल गायकी हा एकच असूनही त्यात थोडा फार फरक जाणवतोच. उदा०- एखाद्या घराण्यात आलाप-विस्तार अधिक केला जातो तर दुसऱ्या घराण्यात तानेचा उपयोग जास्तीत जास्त केला जातो. काही घराण्यांमध्ये सुरुवातीचे आलाप नोम तोम असे शब्द उच्चारून केले जातात तर काही घराण्यांमध्ये सुरुवातीचे आलाप शुद्ध आकारात करतात. काही घराण्यांमध्ये गीतातील किंवा ख्याल रचनेतील शब्द इतके अस्पष्ट गातात की ते शब्द नीट कळत नाहीत व त्यामुळे ते अर्थहीन होतात. तर काही घराण्यांमध्ये स्पष्ट शब्दोच्चाराबरोबरच त्यातील भाव प्रदर्शनालाही महत्त्व दिले जाते. आता प्रश्न असा उद्‌भवतो की निरनिराळ्या घराण्यांतील हे अंतर अथवा ही वैशिष्ट्ये गायकांनी एखाद्या विशिष्ट दृष्टीकोनातून मांडली की, कळत न कळत ती वैशिष्ट्ये आपोआप या घराण्यांची ओळख म्हणून रूढ झाली.

या प्रश्नाचे उत्तर देताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आवाज. आवाज हा प्रत्येक व्यक्तीचा स्वतःचा असा विशेष धर्म असतो.

---


१. घरंदाज गायकी - वा. ह. देशपांडे, पृ. क्र. २३.

प्रत्येक व्यक्तीचा आवाज हा वेगळा असतो. यावरूनच असे म्हणू शकतो, जितक्या व्यक्ती तितके आवाज. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीचा आवाज हा दुसऱ्या व्यक्तीपेक्षा भिन्न असतो. यामुळेच आपण न पाहताही आपल्या कोणत्याही परिचित व्यक्तीला, केवळ त्या व्यक्तीच्या आवाजावरूनच ओळखू शकतो. परंतु तरी देखील स्थूल मानाने काही आवाज उदाहरणादाखल, सामान्य प्रकृतिचे असे सांगता येतील – आवाज सुरेल व हलका असणे, जाड परंतु मधुर, बसका आवाज, सपाट आवाज इत्यादी. याप्रमाणे मनुष्याचे जितके चेहरे, तितकेच आवाजाचे ही प्रकार आहेत. सगळ्यांच्याच आवाजात संगीतातील प्रत्येक वैशिष्ट्य उदा०- मुर्की, मींड, गमक, गळ्यातील विविध हरकती इत्यादी येतीलच असे नाही. कोणाच्या गळ्यात जर तान दाणेदार, मोत्यासारखी येत असेल तर ती व्यक्ती आपल्या गायकीत आलापाला प्राधान्य देते. कोणी आपल्या गळ्यात सपाट तान येत नाही, म्हणून वक्रतानांचा जास्तीत जास्त उपयोग करतो. कोणाच्या आवाजात भाव-प्रदर्शन करण्याची क्षमता अधिक असते म्हणून तो आपल्या गायकीत आलापीवरच भर देतो तर कोणाला तानांचे आकर्षण असते. याचप्रकारे गमक, खटके, मुर्की इत्यादींचा प्रयोग देखील आवाजाच्या धर्मावरच अवलंबून असतो. याप्रमाणे गायकीच्या कोणत्याही एका अंगाचा विकास अथवा त्या गायकीच्या विशिष्ट अंगाचे प्राबल्य मुख्यत: त्या व्यक्तीच्या आवाजधर्मावर, गायनातील त्याच्या प्रतिभेवर, त्याच्या आवडीवर, त्याच्या कल्पनाशक्तीवरच अवलंबून असते. अर्थात घराणी होण्याची कारणे आवाजाचा लगाव, आलाप, तान, लयकारी इ. सांगता येतील.



या सर्व गोष्टी लक्षात घेऊन आपण असे म्हणू शकतो की निरनिराळ्या घराण्यांच्या संस्थापकांनीही आपल्या स्वत:च्या आवाजाला शोभून दिसणारी गायकीच आत्मसात केली. आणि तीच पुढे आपल्या शिष्यांनाही शिकविली. प्रत्येक शिष्याच्या आवाजाचे निरनिराळे गुणधर्म असूनही गायकीचा ढंग अथवा रूप किंवा साचा (घराणी)


मुख्यत्वे तोच राहिला. तरी देखील त्यात वैयक्तिक अंतर अवश्य आले. कारण संगीत ही अशी कला आहे की जी शिकायला आणि शिकवायला गुरू-शिष्यांना अनेक वर्षे बरोबर राहावे लागते. कारण ही मौखिक कला आहे. इतकी वर्षानुवर्षे तालीम प्राप्त झाल्यामुळे शिष्य गुरूची नक्कल करायचा प्रयत्न करतो. व काही प्रमाणात तो त्यात यशस्वीही होतो. हळूहळू शिष्य गुरूच्या गळ्यातील विशेष गोष्टी, उदा.- स्वर लावण्याची पद्धत, शब्दोच्चारणाची पद्धत, ताना फेकण्याची पद्धत इ. आत्मसात करावयास लागतो. आणि शिष्याची ही मनोधारणाच बनते की आपण सही सही आपल्या गुरूप्रमाणेच गावे. कारण गुरूचा आदर्श सतत त्याच्या डोळ्यांसमोर असतो. यामुळेच स्वतःच्या आवाजाचा तोल सांभाळून त्याला जितके शक्य असेल, तितकी तो आपल्या गुरूची हुबेहूब नक्कल करण्याचा प्रयत्न करतो. त्या शिष्याचे गाणे ऐकून जर अन्य कोणत्याही व्यक्तीने म्हटले की हा अमुक गुरूचा शिष्य आहे तर हे उद्गार ऐकून त्या शिष्यालाही कृतकृत्य झाल्याचे समाधान वाटते. या गोष्टीचा त्याला अभिमान वाटतो. याप्रमाणे विभिन्न घराण्यांच्या संस्थापकांनी आपल्या आवाजाच्या गुणधर्मानुसार आपली स्वतःची गायकी बनवली व तीच पुढे आपल्या शिष्यांना शिकविली.



भारतीय संगीत हे व्यक्तीनिष्ठ आहे यामध्ये प्रत्येक गायक वादकाला आपल्या प्रतिभेचे प्रदर्शन करण्याची अपूर्व संधी मिळत असते. पाश्चात्य संगीतात कलाकाराला, रचनाकारावरच जास्तीत जास्त अवलंबून राहावे लागते. रचनाकाराने केलेली रचना ही चांगल्या प्रकारे गळ्याने किंवा वाद्याने काढणे एवढेच त्याचे काम असते. स्वतंत्र रीत्या आपल्या प्रतिभेचे दर्शन त्याला घडवता येत नाही. अर्थात एका प्रकारे तो बंधनातच असतो.

याउलट भारतीय कलाकाराला फक्त रागनियमांचेच बंधन असते. बंदिश, आलापाची रचना, रसानुकूल स्वर घेणे, निरनिराळ्या स्वरसंगतींनी चमत्कार दाखवणे त्याच प्रमाणे विभिन्न

अलंकारांनी गायन मधुर व आकर्षक करण्याचे स्वातंत्र्य त्या कलाकाराला असते. यामुळे एकच राग कितीही कलावंतांनी गाइला तरी त्याची रंजकता, वैचित्र्य नष्ट होत नाही. एवढेच नव्हे तर एकच गायक किंवा वादक, त्याचे एकाच रागाचे गायन अथवा वादन वेगवेगळ्या वेळी झाले तरी परिस्थिती, समयानुकूलता व त्याच्या स्वतःच्या अंतःस्फूर्तीने त्याच्या कलाविलास वैचित्र्यपूर्ण आणि त्याच रागाचा आविष्कार भिन्न करीत असतो. याप्रमाणे कलाविलास दाखविण्यासाठी तपश्चर्या व स्वतंत्र प्रतिभेची आवश्यकता असते. या स्वतंत्र प्रतिभेतूनच निरनिराळी घराणी निर्माण झाली. या सर्व घराण्यांचे राग जवळपास सारखेच आहेत, अर्थात काही वेगळेही आहेत आपल्या गायकीला शोभून दिसतील असे. पण राग मांडण्याचा जो ढंग आहे, तो एकमेकांहून थोड्या-फार प्रकाराने वेगळा आहे. ह्या रागविलास करण्याच्या वेगवेगळ्या ढंगालाच शैली असे म्हणतात.




निरनिराळ्या घराण्यांचे वैशिष्ट्य खालील गोष्टींवर आधारित असते. आवाज लावण्याचा ढंग, रागांची निवड, रागविस्तार, बंदिश, ताना वैचित्र्यकारी इत्यादी. या अंगांचा विस्तार निरनिराळ्या घराण्यांत निरनिराळ्या प्रकारांनी केला जातो व तीच अंगे त्या घराण्यांची वैशिष्ट्ये बनली.

अशोक रानडे यांच्या मतानुसार सर्वच वर्तमान घराण्यांचे विभाजन दोन भागात केले जाऊ शकते. ते भाग म्हणजे विस्तारवादी आणि तीव्रीकरणवादी. विस्तारवादी घराण्याचे गायक रागविस्तार शिडीप्रमाणे म्हणजे एक एक स्वर चढत्या क्रमाने करतात. तीव्रीकरणवादी घराण्याचे गायक विस्तार करतेवेळी एकएका स्वरावर दीर्घकाल थांबून त्या स्वराला अनेक छोट्या मोठ्या स्वरसमूहांनी सजवून-नटवून वरच्या स्वराकडे जातात. याप्रमाणे प्रत्येक स्वराला संभाव्य अशा सर्व स्वर-समूहांनी सजवून ते तार षड्जावर पोहोचतात. प्रा. रानडे यांच्या मतानुसार ग्वाल्हेर व जयपूर ही घराणी विस्तारवादी आहेत, तर किराना व आग्रा ही

घराणी तीव्रीकरणवादी आहेत. तर श्री. वा. ह. देशपांडे यांनी घराण्यांचे विभाजन एका वेगळ्याच तत्त्वावर केले आहे. त्यांच्या मते स्वर व लय हे दोन ध्रुव आहेत. त्या दोन बिंदूंना जोडली जाणारी सरळ रेषा काढली जाऊ शकते. या रेषेच्या मध्य बिंदूपासून लय बिंदूकडे झुकणारे घराणे लयप्रधान व स्वर बिंदूकडे झुकणारे स्वरप्रधान म्हणता येईल.'[1]

पं. विनायकराव पटवर्धन म्हणतात, "एका घराण्याने आलापावर जोर दिला तर दुसऱ्याने तानेवर कोणी बोलतानेवर तर कोणी आलाप, तान व बोलतान यांना प्राधान्य दिले. किराना घराण्यात आलापी, जयपूर मध्ये अलंकारिक व कठिण ताना, तर आग्रा घराण्यात लय-प्रधान बोलतानांवर विशेष लक्ष दिले जाते. याबरोबरच त्यांनी असेही सांगितले की, आलाप तान व बोलतान हे तीनही प्रकार ग्वाल्हेर घराण्यात एकत्र पाहायला मिळतात."[2]



पं. लालमणि मिश्र यांनी सांगितले की प्रत्येक घराणे आपल्या वैशिष्ट्यांद्वारे निर्माण होते. त्या खालील गोष्टी महत्त्वाच्या - स्वरांचा लगाव, चीज म्हणण्याचा ढंग, रागविस्ताराची शैली, तानेचे प्रकार, लयकारीचा प्रकार व आवाजाचा लगाव, इत्यादी.[3]

पं. वामनराव ठकार यांनी गायकीची अंगे अशी सांगितली - स्वरोच्चाराची शुद्धता, रागाची शुद्ध रूपे दाखवणे, चीज गाताना शब्द किंवा बोल यांचे स्पष्ट उच्चारण, पदांचे बोल व रागविस्तारांत पदातील भावानुसार भाव निर्माण करणे, लय आणि ताल याबाबतीत खबरदारी, तानप्रसारात अलंकारिकता, गायकीत समयानुसार चमत्कृती दाखवणे इत्यादी.[4]

---

१. संगीत अलंकार - पं. स. भ. देशपांडे, पृ. क्र. ५७.
२. पं. वि. ना. पटवर्धन - संगीत, एप्रिल १९६१.
३. पं. लालमणि मिश्र, संगीत कलाविहार डिसेंबर १९६८.
४. डॉ. पं. वामन ठकार, मुलाखत - गोपाळभट्ट, संगीत कलाविहार जून १९७२.

या सर्व मतांवरून विद्वानांनी एकच गोष्ट थोड्या फार फरकाने वेगवेगळ्या शब्दात मांडली आहे, असे लक्षात येते.


आवाजाच्या लगावामुळेच घराणी एकमेकांपासून वेगळी ओळखता येतात. श्री. वा. ह. देशपांडे म्हणतात – "किराना, आग्रा व जयपूर या तीन्ही घराण्यांचे निरीक्षण केले तर असे आढळून येईल की, किराना घराण्याची आवाज लावण्याची पद्धत गळा आवळून, थोडी अनुनासिक अशी आहे. अब्दुल करीम खां यांना स्वरांची नेमकी उंची किंवा त्या स्वरांची अचूक श्रुतिस्थाने सापडली. त्यामुळे त्यांचा स्वर इतर घराण्यांच्या तुलनेत टोकदार झाला. तर हाच स्वर आग्रा घराण्यात रेकून खरडून लावतात. तर जयपूर घराण्याने म्हणजेच अल्लादिया खां यांनी हाच स्वर सहज, अकृत्रिम व मोकळा लावला. आणि त्याच पद्धती त्यांची वैशिष्ट्ये बनल्या."[१]

अभिजात संगीतात संस्कारित आवाजालाच अधिक महत्त्व असते. शास्त्रीय संगीतात नैसर्गिक मधुर आवाज नसला तरी तो रियाजाने सुरेल बनवता येतो. आवाजाचा लगाव, त्याचा सुरेलपणा, त्यातील वजन, तो स्थिर बनविणे यासाठी त्यावर संस्कार करणे अत्यंत आवश्यक असते. त्यासाठीच तालीम घेणे क्रमप्राप्त ठरते. आवाजावर संस्कार करणे हे प्रत्येक घराण्यांत आवश्यक मानले आहे. आणि घराण्याच्या भेदांना आवाजाच्या तालमीपासूनच खरी सुरुवात होते. एखाद्या घराण्यात प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जर तो शिष्य दुसऱ्या घराण्याच्या गायकाकडे शिकण्यास गेला; तर तो गायक त्याला प्रथम आवाजाचा लगाव बदलण्यास भाग पाडेल. आणि त्याला तशी तालीम देण्यास सुरुवात करेल. स्वरांचे वेगळे लगाव म्हणजेच आवाज व घराण्याची गायकी यांचा परस्पर संबंध आहे.

---

१. घरंदाज गायकी – वा. ह. देशपांडे, पृ. क्र. २५.

म्हणजेच आवाजावर होणाऱ्या संस्कारांना, आवाजाच्या लगावाला घराणेदार गायकीत विशेष महत्त्व आहे. सुरेलपणाला सर्वच घराणी महत्त्व देतात. काही घराण्यांत आवाज दाबून किंवा थोडासा नाकांत लावतात, तर काहीत आणखी वेगळा. घराण्यांची खास खूण म्हणून ओळखण्यास आवाजावर होणाऱ्या संस्कारांची, आवाजाच्या लगावाची मदत होते हे नाकारता येत नाही. आवाज लावण्याच्या विशिष्ट पद्धतीवर, आवाजावर होणाऱ्या संस्कारांवर, त्या त्या घराण्यांचा खास अधिकार आहे हे मान्य करावे लागते. वर्षानुवर्षे आवाजाची मेहनत शिष्यांकडून करवून घेताना गुरूची आवाज लावण्याची पद्धत तसेच इतरही अनेक गोष्टी शिष्याच्या गळ्यात न उतरल्या तरच नवल.



घराण्यांची शिस्त, पद्धत व शुद्धता —


सर्व प्रचलित घराणी संयमाची विशिष्ट मर्यादा पाळतात. शब्दाश्रित भावनेला अभिजात संगीतात गौण स्थान असून स्वराश्रित भावना हीच घरंदाज गायकीची सांगीतिक प्रतिज्ञा आहे. एखाद्या रागाचे मूळ स्वरूप स्वरांच्या माध्यमाने निर्माण होते, स्वरांच्याच माध्यमात टिकून राहते आणि विस्तार पावते, व स्वरांच्या परिसमाप्तीबरोबरच ते विरून जाते. घरंदाज गायकीत स्वराश्रित भावनेलाच महत्त्व आहे.

संगीताचे घटक दोन, स्वर व लय. यांच्या विलासाला जास्तीत जास्त अवकाश ज्या गायकीमध्ये दिला जातो, तिच्यातच संगीताचे मूलभूत सामर्थ्य निर्माण होण्याची शक्यता असते. गायकीत जर या स्वातंत्र्यावर कोणत्याही तऱ्हेचे बंधन पडले, मग ते शब्दार्थाचे असो, नाट्याचे असो अथवा कुठल्याही एखाद्या शब्दाश्रित भावनेचे असले तरी तिची सृजनशीलता त्या मानाने मर्यादितच राहते. या दृष्टीने कोणत्याही घराण्याने स्वर व लय यांशिवाय तिसरे बंधन

जुमानले नाही. म्हणूनच संगीताच्या इतर प्रकारात उदा.- ठुमरी, नाट्यसंगीत इत्यादींमध्ये घराणी निर्माण झाली नाहीत. कारण ठुमरी मुख्यतः शब्दनिष्ठ आहे. आणि नाट्यसंगीतात देखील घराणी नाहीत कारण त्याला नाट्याचे, अभिनयाचे, प्रसंगाचे व शब्दाश्रित भावनेचे बंधन तर असतेच, शिवाय नाटकात उभे राहून गावे लागते व वेळेचेही बंधन सांभाळावे लागते.

घराण्यांचे कार्य आणि महत्त्व—


अभिजात संगीत जिवंत व सुरक्षित ठेवण्यात घराण्यांनी फार महत्त्वाचे कार्य केले आहे. घराण्यांचा मूळ आधार अनुकरण आहे. ज्या व्यक्तीचा आपल्याला आदर वाटतो, आदर्श वाटतो, त्या व्यक्तीचे आपण अनुकरण करतो. त्याप्रमाणे पद्धतीत एक शिष्य व एक गुरू याप्रमाणे संगीतसाधना होते. त्यामुळे शिष्यासमोर नेहमीच आपल्या गुरूचा आदर्श राहतो. ज्याप्रमाणे चांगला गुरू चांगल्या शिष्याचीह्ह अपेक्षा करतो, त्याचप्रमाणे चांगला शिष्य देखील चांगल्या गुरूची अपेक्षा करू शकतो.



ख्याल संगीतात घराण्यांनी अनमोल असे कार्य केले आहे. त्यावेळची परिस्थिती वर्तमानापेक्षा फारच भिन्न होती. त्या काळी शास्त्रीय संगीताचे रसिक व आश्रयदाते राजे-महाराजे होते. हे राजे-महाराजे शास्त्रीय संगीताचे भक्त असल्यामुळे ते कलाकारांना आपल्या दरबारात स्थान देत, आश्रय देत. हे कलाकार आपल्या शिष्यपरिवारासह तेथेच वास्तव्य करीत. त्यामुळे त्या कोणालाही आपल्या उदरनिर्वाहाची चिंता नव्हती. फक्त रियाज करणे आणि तालीम देणे एवढेच कार्य त्यांच्यासाठी होते. आजच्या सारखा धकाधकीचा तो काळ नव्हता. त्यामुळेच या जगांत संगीतकलेइतके श्रेष्ठ काहीच नाही, या श्रद्धेने प्रेरित झालेला तो वर्ग होता. जन्माला यावयाचे ते संगीतकलेसाठी, जगावयाचे ते संगीतकलेसाठी आणि मरावयाचे ते

देखील संगीतकलेसाठीच. आणि ईश्वराने अनेक जन्म द्यावेत ते देखील संगीत कलेच्या सेवेसाठीच, या तळमळीनेच हे कलावंत अंतर्बाह्य प्रेरित झालेले होते. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे एकमेव महान कार्य म्हणजे संगीतसाधनाच होते.


पिढीजात कलावंत आपल्या घराण्याच्या गायकीलाच स्वतःची इस्टेट समजत, व ती योग्य व सत्पात्र शिष्यांना भरभरून देत. कोणत्याही घराण्याचा विकास हा वंशपरंपरेने व शिष्यपरंपरेने होतो. वंशपरंपरेत पुत्र व इतर नातेवाईक येतात तर शिष्यपरंपरेत शिष्यगण. 'आपला वंश मागे ठेवण्याची धडपड करणे' हा वंशशास्त्राचा किंवा जीवशास्त्राचा महत्त्वाचा सिद्धांत आहे. हाच सिद्धांत संगीतातील गायकीच्या घराण्यांनाही लागू होतो. प्रत्येक कलाकाराच्या अंतरीची तळमळ अशीच असते की, आपल्या गायकीचे घराणे हे जिवंत राहिलेच पाहिजे, व दिवसेंदिवस फोफावत जाऊन त्याचा मोठा वृक्ष झाला पाहिजे.



गायनसम्राट खाँ अल्लादिया खाँ यांच्या पुत्राचे मंजी खाँ यांचे अकाली निधन झाले तेव्हा त्यांना फार मोठा धक्का बसला व घराण्यातील परंपरा पुढे चालू राहील ही आशा नष्ट झाली. मंजीखाँच्या शवास खांदा देताना त्यांनी जे दुःखपूर्ण उद्गार काढले त्यावरून परंपरा चालविणारा तेजस्वी पुत्र गेला याबद्दल त्यांना झालेला खेद व्यक्त झाला. ते अश्रुपूर्ण नेत्रांनी सदगदीत होऊन म्हणाले, 'भली की तूने मंजी! आज तू नही मर गया मगर मेरा सौ साल का गाना मार डाला!' या एकाच उदाहरणावरून कलाकारांच्या मनामध्ये व त्यांच्या आचरणात स्वतःच्या गायकीबद्दल, घराण्याबद्दल किती निष्ठा होती, किती अभिमान होता हे स्पष्ट दिसून येते.

त्यावेळच्या कलाकारांचे भवितव्य हे आजच्या कलाकारांइतके अनिश्चित नव्हते. मोठमोठे राजे चांगल्या चांगल्या कलाकारांना आपल्या दरबारांत ठेवण्यास उत्सुक असत. त्यामुळे त्यांच्या शिष्यांचे भवितव्य देखील आपोआपच निश्चिंत बनत असे.

त्या काळांत संगीत-लिपीचा आजच्या इतका प्रचार नव्हता, इतकेच नव्हे तर ध्वनिमुद्रणाची साधने देखील उपलब्ध नव्हती. अशा काळात ही गायकी जिवंत ठेवण्यासाठी गुरूमुखाशिवाय दुसरा मार्गच नव्हता. या परिस्थितीत या कलाकारांनी अनेक राग व हजारो चिजा पुरवाद्या संस्थेप्रमाणे जतन केल्या. आणि हे मोलाचे विद्या-धन आपल्या घराण्यांच्या कर्तव्यतत्पर शिष्यांच्या हाती दिले. हे अनमोल कार्य या घराण्यांमुळेच साध्य झाले. संगीताचा शास्त्र पक्ष हा ग्रंथ-रूपाने लिहून सुरक्षित ठेवता आला; परंतु क्रियात्मक पक्ष या मोठमोठ्या कलाकारांमुळे जिवंत राहू शकला. या गुरू-शिष्यांमुळेच घराण्यांच्या रूपाने अभिजात संगीत सुरक्षित राहिले. घराण्यांचा मुख्य अधिकार अनुकरण असला तरी घराणे म्हणजे केवळ अनुकरणच नव्हे कारण जर नुसते अनुकरण केले, म्हणजे गुरू जसे गाईल, तसेच शिष्य गाऊ लागला किंवा त्याने गुरूची नुसती नक्कलच केली, तर ती नुसती नायकीच होईल. स्वतःची गायकी तयार करण्याच्या दृष्टीने, स्वतःच्या प्रतिभेने शिष्य त्यात भर टाकतच असतो. म्हणजेच नायकीचा हात धरून नव्या नव्या वाटचाली चालण्याचा प्रयत्न करीत असतो. यावरूनच, वा. ह. देशपांडे यांनी आपल्या पुस्तकात (घरंदाज गायकी) मांडलेले एक वाक्य किंवा सिद्धान्त योग्यच वाटतो. ते म्हणतात – 'परंपरा व पृथगात्मता यांच्या संमिश्रणातूनच घराणी मूळ धरतात व फोफावत जातात.' म्हणजेच शिष्य गुरूजवळ शिकत असता त्याचे इतरत्रही लक्ष असायचे. इतरत्र ऐकलेल्या गुणांमधून आपल्या गायकीत शोभतील असे व आपल्या आवाजात खुलून दिसतील, असेच गुण तो आत्मसात करी. यामुळेच या गायकीला आपण 'नवनवोन्मेषशालिनी' असे म्हणू शकतो.




आता प्रश्न असा उद्भवतो की, सध्या धाईगर्दीच्या काळात अभिजात संगीताची परंपरा टिकविण्यासाठी ही घराणी कितपत समर्थ ठरतील ?

एकूण घरंदाज गायकीचे स्वरूप पाहताना असे लक्षात


येते, की ही गायकी आत्मसात करण्यासाठी वर्षानुवर्षे लागतात. यांतून तयार झालेले कलाकार जरी उच्च कोटीला किंवा उच्च दर्जाला पोहचले तरी त्यांची मूळातली चौकस वृत्ती व नवनवीन शिकण्याची वृत्ती कमी होत नाही तर उलट वाढतच असते.

परंतु आजचा काळ हा घाईगर्दीचा आहे. त्यामुळे वेळेचाही प्रश्न उद्‌भवतोच. आज संगीत शास्त्रावर ग्रंथ निर्मिती होत आहे. तसेच संगीत बऱ्याच प्रमाणात स्वरलिपीबद्ध करता येणे शक्य झाले आहे. या स्वरलिपीच्या सहाय्याने नुसत्या बंदिशीच नाही, तर निरनिराळ्या घराण्यांची गायकी देखील स्वरलिपीबद्ध होऊ लागली आहे. संगीतावरील चर्चा, शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम हे घरबसल्या प्रत्येकाला ऐकता येण्याची सोय नभोवाणी, टेपरेकॉर्डर, दूरदर्शन इत्यादी आधुनिक साधनांमुळे झाली आहे. पण सुरुवातीलाच स्पष्ट केले आहे की, संगीत ही अनुकरणशील कला आहे. त्यामुळे ह्या कलेत गुरुमुखी विद्येला जास्त महत्त्व आहे. ही मौखिक कला असल्यामुळे नुसते ग्रंथ लिहून भागणार नाही, तर ती गुरू - मुखातूनच शिकायला हवी.



७) आज मानवाने बरीच प्रगती केली आहे, नवनवे शोध लागत आहेत. आधुनिक सोयी उपलब्ध होत आहेत. रेडियो, टेपरेकॉर्डर, दूरदर्शन ही आधुनिक उपकरणे संगीतासाठी उपयुक्त आहेतच. त्यामुळे आज बऱ्याच लोकांचे मत असे आहे की, या साधनांचा उपयोग करून विद्यार्थी तयार होऊ शकतील. पण ही गोष्ट कितपत साध्य होईल? घराणे पद्धतीत किंवा गुरू-शिष्य परंपरेत शिष्य, गुरूसमोर शिकण्यासाठी बसतो. त्यावेळेस त्या शिष्याची गुरूने सांगितलेल्या गोष्टी आत्मसात करण्याची कुवत, त्याच्या नैसर्गिक अडचणी, गातांना आवाजांत निर्माण झालेले दोष, त्याची होत असलेली किंवा नसलेली प्रगती इत्यादी प्रकारच्या हजारो गोष्टी गुरूसमोर घडत असतात. या सर्व गोष्टी गुरूसमोर घडत असल्याने गुरू सतर्क राहून

त्याला बरोबर मार्गदर्शन करू शकतो. शिष्याला एखादी गोष्ट समजली नसेल, किंवा शिष्याच्या गळ्यातून ती निघत नसेल तर गुरू त्याला अनेक प्रकारांनी समजावून ती गोष्ट शिष्याच्या गळ्यातून काढू शकतो. अशा अनेक अडचणी शिष्यासमोर निर्माण होत असतात. शिकताना शिष्याच्या डोक्यांत अनेक शंकाकुशंकांचे काहूर माजून त्याचे ज्ञानप्राप्तीचे द्वार बंद झालेले असते. आणि हे द्वार गुरूकिल्लीशिवाय उघडणे कठीणच. माझ्या मते ह्या सर्व गोष्टी, आधुनिक उपकरणांच्या मर्यादा लक्षांत घेता साध्य होणाऱ्या नाहीत.




आजच्या आधुनिक काळांत संगीतार्जनाचे आणखी एक साधन म्हणजे गायनशाळा, महाविद्यालये. आज महाविद्यालयीन शिक्षणात संगीत हा ऐच्छिक विषय आहे. या गायनशाळांमधून अथवा महाविद्यालयांतून संगीताचे शिक्षण मिळणारे उच्च दर्जाचे असेलच याची खात्री देता येत नाही. कारण यामध्ये वेळ बांधलेला असतो. एकाच वेळेला अनेक विद्यार्थी शिकत असतात. तसेच हे विद्यार्थी एकसारख्या बुद्धिमत्तेचे नसतात. त्यांची ग्रहणशक्ती आत्मसात करण्याची कुवत एकसारखी नसते. हे सर्व विद्यार्थी एकसारखे नसून देखील त्यांना एकाच दर्जाचे दिले गेलेले शिक्षण कितपत उपयोगी ठरेल? 'सर्वात कमी बुद्धिमत्तेच्या विद्यार्थी जमेस धरून शिक्षण पद्धतीची आखणी करणे' हा शिक्षण शास्त्रातील महत्त्वाचा सिद्धांत आहे.

या सर्व गोष्टींवरूनच सिद्ध होते की आपली संगीत कला वैभवशाली व समृद्ध होण्यासाठी घराण्यांची किंवा गुरू-शिष्य परंपरेची नितांत आवश्यकता आहे. रेडियो, टेपरेकॉर्डर इत्यादी आधुनिक उपकरणांनी ज्ञान मिळेलही, नाही असे नाही. पण ते ज्ञान ओळख होण्यापुरतेच राहील. तेथे देखील गुरू-शिष्य यांची आवश्यकता निर्माण होईलच. आणि घराणे पद्धतीत गुरू-शिष्य परंपरा आहेच. संगीताच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी घराण्यांची किंवा गुरू-शिष्य परंपरेची आवश्यकता आहे व म्हणूनच संगीतात घराण्यांचे फार महत्त्व आहे.

घराणा पद्धतीचे गुण दोष –


प्राचीन काळापासून आजपर्यंत संगीत शिक्षण गुरू शिष्य परंपरेद्वारा जोपासले गेले. गुरू आपल्या गायकीत आपल्या आवाजानुसार शोभणारे, खुलून दिसणारे अलंकार, गमक, विविध प्रकारच्या ताना इत्यादी अनेक गोष्टी आत्मसात करतो. त्यांवर अतोनात मेहनत करून तो त्या गोष्टी साध्य करतो, व त्याच गोष्टी आपल्या शिष्याच्या गळ्यांत उतरविण्याचा वर्षानुवर्षे प्रयत्न करीत असतो. परंतु ही क्रिया करीत असतांना गुरूने आपल्या शिष्याच्या आवाजाचे गुणधर्म ओळखून त्याला त्याच्या आवाजावर शोभणाऱ्या गोष्टी शिकविल्या पाहिजेत. याप्रमाणे गुरूसमोर बसून गाणे शिकतांना शिष्याने डोळसपणे सर्व गोष्टी ग्रहण केल्या पाहिजेत. अंधानुकरण करू नये. काही शारीरिक दोषांमुळे अथवा व्यंगामुळे गातांना गुरूला काही कष्ट होत असतील, किंवा आवाज लावण्याच्या पद्धतीत काही दोष दिसत असेल तर शिष्याने तो दोष टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्या गोष्टी आपल्या 'घराण्याचे वैशिष्ट्य' म्हणून आत्मसात करू नये.



घराणा पद्धतीचा विचार करतांना आपल्याला असे जाणवते की, नामवंत गुरूंनी विद्यादान केले आणि त्यांचे सगळेच शिष्य कलाकार म्हणून निपजले, असे मुळीच झालेले नाही. तर घराणे पद्धतीत एक कलाकार हा नामवंत गायक होतो. आणि पुढे त्याच्याच शिष्य शाखेतून एखादा शिष्य नावलौकिक प्राप्त करतो व त्यामुळे आपोआपच त्याच्या गुरूचे मोठेपणही लोकांच्या लक्षांत येते. म्हणूनच म्हणतात की, 'Artiste is born not made'.

गुरूगृही राहून विद्या ग्रहण करताना विद्यार्थ्याला सतत तेच वातावरण लाभे. गुरूची स्वतःची मेहनत, इतर गुरूबंधुंची मेहनत व स्वतःची मेहनत आणि त्याच विषयाची गुरूगृही चाललेली चर्चा इत्यादी गोष्टी शिष्याला ज्ञानप्राप्तीसाठी अनुकूल असत. यातून सर्वच शिष्य कलाकार तर होतातच, पण एखादाच, नामवंत श्रेष्ठ कलाकार होतो.

प्रत्येक व्यक्तीची आवड-निवड भिन्न असते, व त्यामुळेच सौंदर्याविषयीच्या त्यांच्या कल्पना देखील भिन्न स्वरूपाच्या असतात. याप्रमाणे गुरू-शिष्यांच्या संबंधी, आवडी निवडी इत्यादी गोष्टी भिन्न असतात यात शंकाच नाही. त्यामुळे गुरूने आपल्या शिष्याच्या इच्छेप्रमाणे त्याच्याही प्रतिभेचा उपयोग करून घ्यायला हवा. त्यामुळे त्या शिष्याच्या कल्पनाविलासाला, बुद्धीला चालना मिळेल व तो आपला विकास स्वतंत्रपणे करू शकेल. प्रत्येक व्यक्तीच्या आवाजांतील गुणधर्मावरच त्याच्या गायकीचे स्वरूप अवलंबून असते. उदा.- एखाद्याचा आवाज जाड व ढाला असेल तर त्याच्या आवाजात गमकयुक्त ताना जास्त शोभून दिसतील. एखाद्याचा आवाज पातळ, लवचिक असेल तर त्याच्या गळ्यात सरळ व सपाट ताना जास्त शोभून दिसतील. शिष्याने सर्व बाजूंनी ऐकून शिकले पाहिजे. या बाबतीत गुरूनेही त्याला मार्गदर्शन केले पाहिजे.




प्रा. बा. र. देवधर यांनी अनेक घराण्यांच्या गायकींचे सूक्ष्म निरीक्षण केले आहे. आणि त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, एकाच गुरूचे चार शिष्य तंतोतंत आपल्या गुरूसारखे गात नाहीत, तर व्यक्तिगत स्वभाव, आवाज, परिस्थिती यामुळे प्रत्येकाच्या गायकीत अंतर पडते. त्यांच्यामध्ये काही गोष्टींचेच साम्य असते. उदा.- गुरूची स्वर लावण्याची पद्धत, त्याचे हस्तविक्षेप, त्याचप्रमाणे चिजांचे स्थूल स्वरूप (आसखडा) इत्यादी.

प्रा. देवधर म्हणतात की, 'लक्ष देऊन मी अवलोकन केले, तेव्हा आमचे गुरूजी पं. पलुस्कर यांच्यासारखी हुबेहूब शैली कोणत्याही शिष्याने आत्मसात केली नाही असे आढळून आले. पण प्रत्येकाने प्रयत्न मात्र केला. पं. पलुस्कर हे आपल्या प्रत्येक शिष्याचा स्वभाव, त्याच्या आवाजाची जात व प्रतिभा जाणत. प्रत्यक्ष गाण्याचे शिक्षण देतांना ते कटाक्षाने विद्यार्थ्यांच्या आवाजाच्या गुणधर्मानुसार त्याला विशिष्ट प्रकारचे शिक्षण देत. ज्याच्या आवाजात कंपन व तान नसेल, त्याला ते धृपद-धमार गायकी शिकण्याचा आग्रह करीत व सांगत की, जर तुला

ख्यालगायकी आवडत असेल तर त्यांत तानबाजी कमी व आलापी जास्त कर. त्यांनी असे सांगितले की पं. विनायकराव पटवर्धन यांनी आपल्या गुरूजींची (पं. पलुस्कर) गायकी आत्मसात करण्याचा बराच प्रयत्न केला. व गुरूजींच्या गायकीत नवनिर्मिती साधण्याचा प्रयत्न पं. ओंकारनाथ ठाकुर यांनी केला. पं. ओंकारनाथ ठाकुर यांना आलापीमध्ये जास्त रस असल्याने गुरुजींनी त्यांना आलापप्रधान गायन गायला सांगितले.'[1]

यावरून असे लक्षात येईल की, प्रत्येक गुरूने आपल्या शिष्याला ख्यालगायकीच्या ज्या अंगात रस असेल त्या अंगाचा विस्तार अधिक कसा करावयाचा ते शिकविले पाहिजे, व ह्या गोष्टींसाठी त्याला सतत प्रोत्साहन दिले पाहिजे. ही गोष्ट आपल्या घराण्याच्या गायकीत नाही, असे सांगून त्याला निरुत्साही करू नये. त्याचप्रमाणे चांगले, चांगले, वाईट हे नीटपणे समजावून त्याला मार्गदर्शन करावे.




अलीकडे गुरु-शिष्य प्रणाली विकृत होऊ लागली आहे. अपवाद सोडले तर बरेचसे गुरु पक्षपाती व स्वार्थी बनू लागले आहेत. त्याचबरोबर शिष्यांच्याही मनात गुरूंबद्दल आदर राहिलेला नाही. तो देखील स्वार्थी झाला आहे. त्यामुळे गुरूंना त्यांच्या शिष्यांबद्दल प्रेम वाटेनासे झाले आहे. अर्थात टाळी एका हाताने कधीच वाजत नाही. ह्यामध्ये दोष दोघांचाही आहे. आणि याला बहुतांशी सामाजिक परिस्थितीच कारणीभूत आहे.

त्याचप्रमाणे आजकाल मोठमोठे कलाकार भारताबाहेर, पाश्चात्य देशांत जाण्यात स्वतःला धन्य समजतात. हिंदुस्थानी संगीताचा प्रचार व प्रसार भारताबाहेर देखील फार मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. तिथे देखील या कलाकारांनी संगीताचे शिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. पण या गोष्टीचे आजचे स्वरूप पाहता मनांमध्ये अशी भीती निर्माण होते की, असे न होवो की काही वर्षांनी भारतीयांना आपल्याच संगीताचे शिक्षण घेण्यासाठी भारताबाहेर जावे लागेल. वाद्यसंगीताबाबत असेच आढळते.

---

१. पं. ओंकारनाथ ठाकुर - प्रा. बा. र. देवधर, संगीत कलाविहार, ऑगस्ट १९५७.


महाविद्यालयीन संगीत शिक्षणाचे स्वरूप देखील फारसे समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही. आज ज्यांना गाण्यात रूची आहे किंवा ज्यांच्या जवळ प्रतिभा आहे, जे काही करू इच्छितात अशा विद्यार्थ्यांना घरंदाज तालीम मिळू शकत नाही. कारण जे मोठमोठे नामवंत कलाकार आहेत, ते सर्व मोठमोठ्या शहरांमधून वास्तव्य करून आहेत. वेळ व पैसा या दोन्ही गोष्टींमुळे मध्यम परिस्थितीतली मुले-मुली मोठ्या शहरांमध्ये शिकण्यास जाऊ शकत नाहीत. यासाठी सरकारने शिष्यवृत्त्या देऊ केल्या आहेत, पण त्यातही अंदाधुंदी व भ्रष्टाचार वाढल्यामुळे त्याचेही काही खरे नाही. पूर्वी राजे-महाराजे आपल्या दरबारांत कलाकारांना आश्रय देत. यामुळे त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्या त्या संस्थानिकांवरच पडत असे. परंतु आज ह्यांपैकी काहीच उरले नाही. आजचे युग हे यांत्रिक युग आहे. जास्त लोकसंख्येमुळे बेकारीचा प्रश्न दिवसेंदिवस वाढतोच आहे. कारण कलाकारांना आश्रय देणारे पूर्वीचे संस्थानिक देखील राहिले नाहीत. व सरकारी आश्रय पण नाही.



परंतु याही परिस्थितीत घराणी टिकविण्याचे प्रयत्न मात्र केले पाहिजेत. निदान सुरुवातीला अनुकरण करण्याच्या दृष्टीने घराणी आवश्यक आहेत. व्यक्ती-परत्वे त्यांत फरक पडणार ती गोष्ट वेगळी. घराण्यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारची शिस्त येते. ख्यालगायन याचा अर्थ कल्पनागायन असा जरी असला तरी त्यात शिस्त आवश्यक आहेच. संगीतातच कशाला मनुष्याच्या जीवनामध्येच शीस्त आवश्यक आहे. 'शिस्त म्हणजे कडकच' असे नव्हे. आपण रस्त्यावर पाहतो की, जर वाहतूक नियंत्रण नसले तर सगळी वाहतूक विस्कळीत होते. व अशा वेळी अपघात होण्याचा संभव असतो. अशा ठिकाणी अपघात टाळायचे असतील तर शिस्तीचा अभाव चालणार नाही. माझ्या मते नेमकी हीच गोष्ट संगीतातील घराण्यांनाही लागू पडते. या घराण्यांच्या रूपाने विद्यार्थ्यांसमोर काही आदर्श असतात. जर हे आदर्शच राहिले

नाहीत तर विद्यार्थ्यांचा मार्गच विस्कळीत होऊन जाईल व तो पथभ्रष्ट होईल. या घराण्यांमुळे निदान ज्याला ज्या वाटेने जायचे असेल ती वाट तर त्याला सापडेल.

संगीत ही अशी कला आहे की, जी एकाच गुरूकडे शिकून भागत नाही. आपण संगीतातील थोर कलाकारांच्या जीवन-चरित्रावर नजर टाकली तर असे दिसून येईल की, त्या थोर कलाकारांनी अनेक गुरू केलेत. उदा०- भास्करबुवा बखले, यांच्या गायकीत तीन वेगवेगळ्या घराण्यांचा रंग मिसळला होता, म्हणजे फैजमहंमद खां यांचा ग्वाल्हेरी, नथ्थन खां यांचा आग्रा घराण्याचा व अल्लादिया खां यांच्या जयपूर घराण्याचा. व यांतून त्यांनी आपली सौंदर्यपूर्ण गायकी निर्माण केली.



आज सगळे कलाकार म्हणतात की संगीत कला जितक्या लोकांजवळ शिकता येईल, तितकी थोडीच. पण आज असे किती गुरू असतील की, ज्यांना आपल्या शिष्याने दुसऱ्या कलाकाराकडे शिकणे आवडेल. प्रत्येक गोष्टीला अपवाद असतातच, पण हे अपवाद अगदी बोटांवर मोजण्याइतकेच असतात.

आजची स्थिती अशी आहे की, कोणीही घराण्यांचे बंधन पाळत नाही. मग प्रश्न असा निर्माण होतो की, जर घराण्यांचे बंधन नाही तर परंपरागत बंदिशींचा आग्रह कशाला? यादृष्टीने नवीन बंदिशी तयार केल्या पाहिजेत.

घराणी टिकवून ठेवण्यासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्यांमध्ये यश मिळविणे आज कठिण आहे. कारण औद्योगिक क्रांतीमुळे मनुष्य जीवन वेगवान झाले आहे. त्यामुळेच शिष्याला दहा, बारा वर्षे गुरूच्या सान्निध्यात राहून शिक्षण घेणे अशक्य आहे. कारण आज नुसते संगीत शिकून चालत नाही तर महाविद्यालयाची पदवी देखील आवश्यक असते. त्याशिवाय नोकरी मिळणे अशक्यच. त्यामुळे शिष्य गुरूगृही वर्षानुवर्षे राहू शकत नाही. आर्थिक परिस्थितीमुळे गुरू सुद्धा

शिष्याला आपल्या घरी ठेवू शकत नाही. या सर्व कारणांमुळेच घरंदाज गायकीचे भवितव्य धोक्यात आले आहे. परंतु या गोष्टींमधून मार्ग काढून घराणी किंवा गुरू-शिष्य परंपरा टिकविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

